बुधवार, 14 सप्टेंबर 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 44
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 14 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-44 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-8 ● PRICE-5

## पश्चिम बंगालमध्ये राडा




पश्चिम बंगाल सरकारविरोधात भाजपाने आक्रमक पवित्रा धारण केला असून तृणमूल काँग्रेसविरुद्ध 'चलो नबन्ना' मोर्चाचे आयोजन केले. या मोर्चात भाजपाच्या असंख्य कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. मात्र, पोलिसांनी या कार्यकर्त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे भाजपा कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये वाद झाला.

### चर्चेतली बातमी

## खा. नवनीत राणा यांच्या विरोधात निवृत्त पोलीस आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** खासदार नवनीत राणा यांनी पोलिसांचा अवमान केल्याच्या विरोधात आज सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने पोलीस आयुक्तालयावर धडकले. पोलिसांशी अरेरावी, उद्धट वागणूक आणि शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी नवनीत राणा यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी, त्यांनी पोलीस आयुक्त डॉ. आरती सिंह यांच्याकडे केली. नवनीत राणा यांची पोलिसांसोबत नेहमीच असभ्य वागणूक असते. रागाच्या भरात घरातून निघून गेलेल्या युवतीच्या प्रकरणाला 'लव्ह-जिहाद'चे वळण देऊन; समाजात तेढ निर्माण करणे, यासह पोलिसांचा सातत्याने अपमान करणे, हा प्रकार खासदारांना शोभत नाही. त्यांच्या विरोधात योग्य अशी कारवाई व्हावी, या मागणीसाठी आज सेवानिवृत्त पोलिस अधिकारी आणि कर्मचारी संघटनेने पोलीस आयुक्तालयावर धडक दिली.

नवनीत राणा यांची पोलिसांसोबतची ही वागणूक योग्य नाही. त्या सातत्याने पोलीस आयुक्त आणि पोलीस अधिकाऱ्यांचा अपमान करतात. पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांचे कर्तव्य खासदार नवनीत राणा यांना ठाऊक नाही. बारा ते पंधरा तासापर्यंत कर्तव्य बजाविणाऱ्या पोलिसांना नेमक्या किती वेदना सहन कराव्या लागतात, याची जाणीव खासदार नवनीत राणा यांना नाही. पोलिसांच्या प्रति त्यांचे वागणे योग्य नसून; त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी, पोलीस अधिकारी आणि कर्मचारी संघटनेच्या वतीने करण्यात आली. नवनीत राणा यांच्यावर कारवाई व्हावी, यासाठी पोलीस आयुक्तालयावर धडकलेल्या सेवानिवृत्त पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना भेटण्यासाठी स्वतः पोलीस आयुक्त आपल्या दालनातून बाहेर आल्या. यानंतर पोलीस आयुक्तांनी सर्वांना सभागृहात बसण्याची विनंती केली. त्यानंतर प्रत्येकाशी वैयक्तिक संवाद साधून सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्याबाबत आणि खासदार नवनीत राणा यांच्या बाबतचे त्यांचे म्हणणे जाणून घेतले.



### महत्त्वाची बातमी

## धनंजय मुंडेंचा शिंदे सरकारला टोला

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** नेमकी कुणाची शिवसेना खरी? किंवा शिवसेनेचे निवडणूक चिन्ह 'धनुष्यबाण' नेमके कुणाचे? या प्रश्नांसोबतच दसरा मेळावा नेमका कुणाचा? या प्रश्नावरूनही राजकारण सुरू झाले आहे. या पार्श्वभूमीवर दसरा मेळाव्याच्या राजकारणावर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे यांनी प्रतिक्रिया देताना शिंदे सरकारवर टीकास्त्र सोडले आहे. ते म्हणाले की, दसरा मेळाव्यावरून सुरू असलेले राजकारण हा शिंदे गटाकडून राजकीय पोळ्या भाजून घेण्याचा प्रकार आहे. धनंजय मुंडेंच्या नेतृत्वाखाली आज शिरूरमध्ये शेतकऱ्यांच्या मागण्या मांडण्यासाठी जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना मुंडेंनी शिंदे सरकारवर तोंडसुख घेतले. दसरा मेळाव्यासाठी राजकारण होणे, शिवसेना कुणाची या प्रश्नावरून राजकारण होणे, सरकार बदल करणे हे करणारे सरकार जनतेच्या हिताचे नाही. जनतेच्या हिताच्या मुद्द्यांवर हे सरकार स्थापन झालेले नाही. जनतेच्या काही मुद्द्यांवर हे आमदार फुटून बाहेर पडले आणि त्यांनी गट केला असं काही झालेलं नाही. यांना जनतेशी काहीही देणं-घेणं नाही. राजकीय पोळ्या भाजून घेण्याचं त्यांचं काम सुरू आहे.

## स्वत:साठी खोके आणि महाराष्ट्राला धोके

### महाराष्ट्रात येणारा प्रकल्प गुजरातला गेल्याने आदित्य ठाकरेंचा हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई : वेदांत कंपनीचा महाराष्ट्रात येणारा प्रकल्प गुजरातला गेल्याने शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी शिंदे सरकारवर टीकास्त्र सोडले आहे. वेदांतचा हा प्रकल्प महाराष्ट्रात येणार, हे जवळपास निश्चित झाले असताना हा प्रकल्प गुजरातला गेलाच कसा? असा सवाल आदित्य ठाकरेंनी विचारला आहे. स्वत:साठी खोके आणि महाराष्ट्राला धोके, असे हे सरकार असल्याची टीका आदित्य ठाकरेंनी केली आहे. ते पत्रकार परिषदेत बोलत होते.**

यावेळी आदित्य ठाकरे म्हणाले, वेदांतचा संबंधित प्रकल्प महाराष्ट्रात यावा, यासाठी आम्ही मागील अनेक दिवसांपासून चाचपणी करत होतो. अनेक बैठका घेत होतो. हा प्रकल्प महाराष्ट्रात येणार हे जवळपास ९५ टक्के निश्चित झाले होते. स्वाक्षरी झाल्यानंतर १०० टक्के प्रकल्प महाराष्ट्रात आला असता. संबंधित कंपनीने पुण्याजवळील तळेगाव येथे प्रकल्प उभारण्यासाठी जागा निश्चित केली होती. सर्वकाही सकारात्मक घडत असताना, एवढा मोठा प्रकल्प गुजरातला कसा काय गेला? असा प्रश्न आम्हाला पडला आहे. आदित्य ठाकरेंनी पुढे सांगितलं की, सुभाष देसाई आणि मी वेदांत कंपनीसोबत चर्चेच्या अनेक फेऱ्या पार पाडल्या. २१ जानेवारी २०२२ रोजी आमची वेदांत आणि फॉक्सकॉनच्या उद्योगाबाबत चर्चा झाली. त्यानंतर जागा निश्चितीसाठी मराठवाडा, विदर्भ आणि पुणे विभागात अनेक ठिकाणी पाहणी करण्यात आली. शेवटी पुण्याजवळील तळेगाव येथील जागा निश्चित केली. हा उद्योग गुजरातमध्ये जाण्याबाबत किंवा कुठेही इतरत्र जाण्याबाबत दुःख नाही. पण ही कंपनी महाराष्ट्रात येणार हे ९५ टक्के ठरले असताना, शेवटच्या क्षणी ही गुंतवणूक दुसरीकडे का गेली? हा प्रश्न आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे हा उद्योग पावणे दोन लाख कोटींचा आहे. या उद्योगासोबत १०७ इतर छोटे-मोठे उद्योग उभे राहणार होते. याच्या माध्यमातून ७० हजार ते १ लाख रोजगार निर्माण होणार होते. सध्या महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर आहे. हे वातावरण महाराष्ट्राच्या विकासासाठी चांगले नाही. आगामी काळात क्युबिक, एअर बस किमान हे प्रकल्प तरी महाराष्ट्रात यावेत, अशी आमची इच्छा आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या वेळीही मुंबईतील अनेक उद्योग अहमदाबादला गेले. स्वतःसाठी खोके आणि महाराष्ट्रासाठी धोके, असे हे सरकार आहे. 'बाजीगर' चित्रपटात एक डायलॉग आहे, 'हार के जीतने वाले को बाजीकर कहते है', पण या गुंतवणुकीच्या बाबतीत, जीत के हारनेवाले को खोके सरकार कहते है, असं लागू होते" अशा शब्दांत आदित्य ठाकरेंनी शिंदे सरकारवर निशाणा साधला आहे.

## राजुरेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी


### टाळ-मृदंगाच्या गजरात राजुरेश्वराचा जयघोष

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा.बाळासाहेब बोराडे**

**श्रीक्षेत्र राजूर :** जालना जिल्ह्याचे ग्रामदैवत तथा मराठवाड्यातील प्रसिद्ध गणपती संस्थान श्रीक्षेत्र राजूर येथील राजुरेश्वराच्या दर्शनासाठी अंगारकी चतुर्थी निमित्ताने भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती.जिल्ह्यासह मराठवाड्यातील विविध ठिकाणांहून येणाऱ्या भक्तांमध्ये'श्री'च्या दर्शनाची ओढ कायम दिसून आली.दिंड्यांसह टाळ मृदुंगाच्या गजरात राजुरेश्वराचा जयघोष करत भाविक मंदिराच्या पायथ्याशी दाखल झाले होते. पावसापासून भक्तांचा बचाव व्हावा म्हणून गणपती संस्थांकडून मंडपची व्यवस्था करण्यात आली होती. सुरवातीस भक्तांचाओघ थोडा कमी होता.परंतु नंतर मात्र दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या गर्दीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून आले.आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी हजारो भक्तांनी रांगेत उभे राहून' श्रीराजुरेश्वराचे दर्शन घेतले. सर्वप्रथम केंद्रीय रेल्वेमंत्री ना.रावसाहेब पाटील दानवे, सौ.निर्मलाताई दानवे,जिल्हाधिकारी डॉ.विजय राठोड, तहसीलदार तथा संस्थान अध्यक्ष सारिका कदम,आदी मान्यवरांच्या हस्ते महागणपती श्री राजुरेश्वराची पूजा व महाआरती करण्यात आली. यावेळी गणपती संस्थान विस्वस्थ गणेश मामा साबळे, सुधाकरराव दानवे,सरपंच भाऊसाहेब भुजंग,उपसरपंच विनोद डवले,माजी सरपंच शिवाजीराव पुंगळे,कार्यालयीन अधीक्षक प्रशांत दानवे, भगवानराव नागवे,श्रीरामपंच पुंगळे, ग्रामसेवक प्रमोद पुंगळे,'श्री'चे पुजारी मनोज साबळे, ज्ञानेश्वर साबळे,कृष्णा साबळे,ग्रामपंचायत सदस्य आप्पासाहेब पुंगळे,राहुल दरख,मोहिनीराज मापारी यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.श्रीफळ,फुलांचे हार,मिठाई,पूजेचे सामान आदी पवित्र वस्तूंना मोठी मागणी होत असते.दर्शनास आलेल्या भक्तांनी श्रीचरणी अर्पण करण्यासाठी पानफुलं व प्रसाद साहित्याची मोठ्या प्रमाणावर खरेदी केल्याचे दिसून आले. दिवसभर पावसाने उघडीक दिल्याने भाविक आणि व्यावसायिकांना थोडा दिलासा मिळाला. स्वयंसेवी संस्थां,'श्री'चे सेवेकरी,सामाजिक कार्यकर्ते आणि दानशूर व्यक्तींनी भाविकभक्तांसाठी चहा, पाणी व फराळाची व्यवस्था केली होती.अस्वस्थ वाटणाऱ्या रुग्णांनाची सेवाभावी डॉक्टरांनी मोफत तपासणी करून त्यांच्यावर उपचार करण्यात आले.शासकीय रुग्णालयातील अधिकारी,कर्मचारी यांनीही भाविकांना आरोग्य सेवा पुरवली.दक्षता म्हणून आरोग्य विभागाने रुग्णवाहिकाही सज्ज करून ठेवल्या होत्या. भाविकांच्या गर्दीमुळे रस्त्यांच्याकडेला दुचाकी व चार चाकी वाहनांच्या संख्येत मोठी वाढ झाली होती.त्यामुळे पार्किंग व्यवस्था लावण्यासाठी पोलिसांना थोडी तारेवरची कसरत करावी लागली.वाहतुकीची कोंडी हाऊ नये म्हणून मंदिरापासून एक किलोमीटर अंतरावर खाजगी वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली होती.भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून एसटी बसच्या फेऱ्या वाढवण्यात आल्या होत्या. जिल्हा अधीक्षक विक्रांत देशमुख, उपविभागीय पोलीस अधिकारी इंदलसिंग बहुरे,सहायक पोलिस निरीक्षक संतोष घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी म्हणून पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.प्रत्येक चौकात समूहाने पोलीस व होमगार्डची टीम कर्तव्य बजावत उभे होते.पावसाची पर्वा न करता भक्त आपल्या लाडक्या बाप्पाच्या दर्शनासाठी श्रीक्षेत्र राजूर येथे दाखल झाले होते.इच्छिलेली मनोकामना पूर्ण व्हावी म्हणून भाविक'श्री'चरणी नतमस्तक होत होते. राजुरेश्वराचे दर्शन झाल्याचे समाधान भक्तांच्या चेहऱ्यावर दिसत होते.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

नुकताच आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा केला. आपण जसा स्वातंत्र्यलढा पाहिला ( अर्थात विशाल अर्थाने हा स्वातंत्र्य संग्राम आहे ) तसे अनेक वेगवेगळ्या प्रकारचे लढे भारताने अनादी काळापासून अनुभवले आहेत. कधी तो १८५७ चा लढा असेल ज्याला स्वातंत्र्यवीर सावरकरांनी ' १८५७ चे स्वातंत्र्यसमर ' असे म्हटले आहे. कधी लोकमान्य टिळकांनी सुरु केलेला विदेशी वस्तूंच्या वापराविरुद्धचा लढा असेल वा पुढे गांधीजींनी सुरु केलेली वेगवेगळी आंदोलनं असतील, गोवा मुक्ती संग्राम, हैदराबाद मुक्ती लढा असेल, अशा अनेक असंख्य लढ्याची पार्श्वभूमी आपल्या इतिहासाला आहे. आज आपण या सर्वांपेक्षा आगळावेगळा असा एक लढा पाहणार आहोत. हा लढा निसर्गावर होणाऱ्या मानवाच्या आक्रमणाविरुद्ध आहे. या लढ्यात जसे पुरुष सामील आहेत, तशाच स्त्रियाही सामील आहेत. किंबहुना महान लढवय्या स्त्रियांच्या प्रेरणादायी त्यागाने हा इतिहास भरलेला आणि भारलेला आहे. अशा काही स्त्रियांचा परिचयही या लेखमालेद्वारे करून द्यायचा प्रयत्न असणार आहे.

खरं तर या लढ्याला ' चिपको आंदोलन ' किंवा ' मिठी मार ' आंदोलन असं म्हणता येईल. पण हा त्या विशाल लढ्याचा केवळ एक भाग आहे. मुख्य म्हणजे त्या त्या ठिकाणच्या स्थानिक जनतेने पर्यावरण वाचवण्यासाठी दिलेला हा लढा आहे. आपण स्वतःला जर भारताचे एक जबाबदार नागरिक म्हणवून घेऊ इच्छित असलो, पर्यावरण प्रेमी म्हणवून घेऊ इच्छित असलो तर हा लढा आपल्याला समजून घेणे आवश्यक आहे. कारण हा लढा आपल्याला जणू इशारा देतो आहे की ' सावध ऐका पुढल्या हाका .' या हाका आपल्याला नाही ऐकू आल्या किंवा आपण त्याकडे दुर्लक्ष केले तर निसर्ग आपल्याला क्षमा करणार नाही, आपल्या पुढच्या पिढ्या आपल्याला क्षमा करणार नाहीत. पर्यावरण म्हणजे नेमके काय हे न शिकलेल्या परंतु निसर्ग आणि पर्यावरण ज्यांच्या जगण्याचा एक भाग आहे अशा अशिक्षित अशा लोकांनी घडवलेला हा इतिहास आहे. तो जर आपण समजून घेणार नसू तर आपल्यासारखे करंटे आपणच असू हे खेदाने म्हणावे लागेल. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

### प्रेमाची अनुभूती घ्यावी

आधुनिक केसरी

प्रेमाची परिभाषा समजण्यासाठी अगोदर त्या प्रेमाची अनुभूती घ्यावी लागत असते. प्रेम दिल्याशिवाय ते मिळतेच असे नाही. अनेकदा ते मिळत नाही म्हणून दिलेही जात नाही. प्रेमामध्ये त्याग महत्वाचा असतो, तोच अनेकदा नको असतो. प्रेम हे काही केवळ एक स्त्री-पुरुष ह्यांच्या परस्परांतील असते असे नाही. आपले अंतर्मन हे खरे तर प्रेमाचे प्रतिबिंब असावे, त्या प्रतिबिंबित छबीदार रूपांत दडलेल्या प्रेमाचा साक्षात्कार व्हावा लागतो. प्रेमाची परिभाषा आर्थिक प्रमेयाशी जोडली जात असल्याचे खेदजनक चित्र अनेक ठिकाणी आपल्याला दिसत असते.

प्रेमामध्ये शब्दांपेक्षा भाव-भावनाच अधिक महत्वाच्या असतात. निस्वार्थी प्रेमाची जाणीव असणे जरुरीचे असते. सुखामध्ये देखील आपल्यापैकी अनेकजण शरीरसुख हेच सर्वोच्च सुख असल्याच्या भ्रमांत आणि संभ्रमांत असतात. त्याही सुखांत शरीरापेक्षा मनाचा सहभागच अधिक असतो ह्याची त्यांना जाणीव होत नाही. "ते" सुख म्हणजेच जीवनाचे सार नाही.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

सुखाचा संबंध अनेकदा शरीराशी जोडला जात असतो. सुखद अनुभवांची आश्वासकता ही मनाला देखील जरुरीची असतेच. परंतू शारीरिक पातळीवर सुखी होण्याची केविलवाणी धडपड आपण दिवसरात्र करत असतो.

जीवनाचे खरे सार आपण दुसऱ्यांना, इतरांना देत असलेल्या आणि आपल्याला मिळत असलेल्या प्रेमांत सामावलेले असते. प्रेमासाठी तन अथवा धन नाही, तर मन महत्वाचे असते, ह्याची जाणीव सतत ठेवणे जरुरीचे असते. प्रेमाच्या प्रप्तीचीच अनेकदा उणिव असल्याचे दिसते, त्यामुळेच समूहामध्ये, घोळक्यात, गर्दीत देखील एखादी व्यक्ती स्वतःला एकटे समजत असते. त्याउलट प्रेमाचा वर्षाव होत असलेल्या व्यक्तीला एकटे असताना देखील मानसिक एकलेपण जाणवत नाही. तेच खरे जीवनातले सार आहे.



आधुनिक केसरी

### विठ्ठल हो त्राता | जीवभावे ||

आता तरी थोडे | ठेवा अवधान ||
मृत्यूचे कारण | दारी आले ||१||

करावी सलगी | राखूनी अंतर ||
रहावे निरंतर | सावधान ||२||

फुकाचा विश्वास | फुकाची करणी ||
यमाची पाहुणी | महामारी ||३||

वैद्य झाला रोगी | उतारा न याला ||
भाळी भोग आला | कैसा देवा ||४||

अध्यात्माची जोड | विज्ञानी मिळता ||
विठ्ठल हो त्राता | जीवभावे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"


आधुनिक केसरी

**जगदम्ब नमस्तुभ्यं विश्वाम्बिके नमो नमः।**
**श्रीरेणुके नमस्तुभ्यं मे मातृके नमो नमः।।१ ।।**
जगदंबिके, तुला नमस्कार असो. विश्वाम्बिके, तुला नमस्कार असो. माझे आई, श्री रेणुके, तुला नमस्कार असो. नमस्कार असो.
**जगदम्ब नमस्तुभ्यं चन्द्रशेखरवल्लभे।**
**हे कल्याणि नमस्तुभ्यं वात्सल्यमूर्तये नमः।।२ ।।**
जगदंबिके, चंद्रशेखरवल्लभे, तुला नमस्कार असो. हे कल्याणी, वात्सल्यमूर्ती, तुला नमस्कार असो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



### द्रुष्यनिरसन

आधुनिक केसरी

जगातील प्रत्येक व्यवस्थेवर जसा आपला विश्वास असतो तसाच तो विश्वास संतांचा पण असतो.पंचमहाभूतांचे द्रुष्य विश्व आपल्याला सर्वस्वी खरे वाटते ते संतांना मिथ्या वाटते. खरें पणाचा केवळ भास आहे असे वाटते. एकदा का तुम्ही संतसंगतीची कास धरली की जीवाची अविद्या कमी कमी होत जाते. ती कमी झाली की सामान्य माणसाच्या विचारात बदल होतो.अविद्येने भरलेल्या मनाच्या नर्मळपणा या द्रुष्याने नाहीसा होतो. वाल्याचा वाल्मिकी झाला हे आपल्याला माहिती आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646


पाण्यावर अनेक बुडबुडे उठतात प्रत्येक बुडबुड्यात प्रतिबिंब दिसते. बुडबुडे लगेच फुटतात त्यामुळे ती मिथ्या रूपी बुडबुडे पण फुटले म्हणून ही रूपे मिथ्या समजा्वीत. द्र्युष्य मिथ्या असुन दिसते.
जड,मूढ अज्ञानी जीव यांना अनुभव येतो व संत,महंत,ज्ञानी पुरूषांना अनुभव येतो . संतांचा अनुभव श्रेष्ठ होय. **(क्रमशः)**

## सम्राट : प्राचीन परंपरा आणि राजकीय संकेताचे प्रतीक

आधुनिक केसरी

राजे चार्ल्स तिसरे यांना शनिवारी एका ऐतिहासिक समारंभात ब्रिटनचे नवे 'सम्राट' घोषित करण्यात आले. त्यानंतर राजे चार्ल्स यांनी आपली आई दिवंगत राणी एलिझाबेथ यांच्या प्रेरणेने काम करण्याचे अभिवचन दिले. प्राचीन परंपरा आणि राजकीय प्रतीकात्मकतेने युक्त असा हा राज्याभिषेक सोहळा इतिहासात प्रथमच दूरचित्रवाणीवरून प्रसारित करण्यात आला.

राणी एलिझाबेथ यांचे गुरुवारी (८/९/२२) निधन झाले.
त्यानंतर शनिवारी (१०/९/२२) लंडनमधील सेंट जेम्स पॅलेस येथे ब्रिटनचे नवे सम्राट म्हणून किंग चार्ल्स तिसरे यांच्या नावाची औपचारिक घोषणा करण्यात येऊन शपथविधी समारंभ झाला. आईच्या निधनानंतर ७३ वर्षीय किंग चार्ल्स तिसरे ब्रिटनच्या राजसिंहासनावर विराजमान झाले आहेत. किंग चार्ल्स यांच्याबरोबर त्यांची पत्नी राणी कॅमिला, त्यांचा मुलगा प्रिन्स विल्यम, नव्या पंतप्रधान लिझ ट्रस आदी उपस्थित होते. सर जॉन मेजर, टोनी ब्लेअर, गॉर्डन ब्राऊन, डेव्हिड कॅमरून, थेरेसा मे आणि बोरीस जॉन्सन हे माजी पंतप्रधान यांच्यासह विरोधी पक्षनेतेही या समारंभाला उपस्थित होते.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

क्वीन एलिझाबेथ द्वितीय यांचे वयाच्या ९६ व्या वर्षी निधन झाले आहे. आता त्यांचाचा मुलगा चार्ल्स राजा झाला आहे. ब्रिटनमध्ये घटनात्मक राजेशाही आहे, त्यानुसार राजा किंवा राणी राज्याच्या प्रमुख आहेत, परंतु राजा किंवा राणी राजकारणात गुंतलेले नसतात.राजकारणापासून ते अलिप्त असतात. कायदा संसदेद्वारे बनविला जातो. तथापि, ब्रिटनच्या राजा किंवा राणीला काही शाही विशेषाधिकार आहेत.
ब्रिटनचा राजा किंवा राणी येथे प्रमुख आहे, ज्याला राज्याचे प्रमुख म्हणतात. राजाचे अधिकार पूर्णपणे प्रतीकात्मक आणि औपचारिक आहेत. याचा अर्थ यूके सरकारमध्ये त्यांचा कमीत कमी हस्तक्षेप आहे.
ब्रिटनचा राजा किंवा राणी राजकीयदृष्ट्या तटस्थ आहे आणि सरकारच्या सल्ल्याचे पालन करण्यास घटनात्मकदृष्ट्या बांधील आहेत.
ब्रिटनचे पंतप्रधान दर आठवड्याला राजा किंवा राणीशी भेट घेतात. यामध्ये राजा किंवा राणीला सरकारी कारभाराची औपचारिक माहिती दिली जात असते.. ही बैठक पूर्णपणे गोपनीय असते. यादरम्यान काय बोलण झालं याची कोणतीही नोंद नसते.
ब्रिटनच्या राजा किंवा राणीची प्रमुख कर्तव्ये
ब्रिटनमधील सार्वत्रिक निवडणूक जिंकणाऱ्या पक्षाच्या नेत्याला राजा किंवा राणी बकिंगहॅम पॅलेसमध्ये बोलावतात, जिथे त्याला सरकार स्थापन करण्यासाठी औपचारिकपणे आमंत्रित केले जाते. अशाच प्रकारे, सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी, ब्रिटनचा राजा किंवा राणी औपचारिकपणे सरकार विसर्जित करतात.
राणी एलिझाबेथच्या मृत्यूनंतर पुढे काय होणार?
संसदीय वर्षाची सुरुवात राजा किंवा राणीच्या राज्य उद्घाटन समारंभाने होते. या दरम्यान, राजा किंवा राणी हाऊस ऑफ लॉर्ड्समध्ये भाषण देतात. यामध्ये ते सरकारचे धोरण आणि योजना सांगतात. संसदेत मंजूर झालेले कोणतेही विधेयक कायदा होण्यासाठी राजा किंवा राणीची औपचारिक मान्यता म्हणजेच स्वाक्षरी घेतली जाते.
ब्रिटनचा राजा किंवा राणी इतर देशांच्या राष्ट्रप्रमुखांना भेट देतात. तो युनायटेड किंगडममध्ये तैनात असलेल्या इतर देशांतील राजदूत आणि उच्चायुक्तांना भेटतो.राणी एलिझाबेथ गेल्या 70 वर्षांपासून या सर्व गोष्टी करत होत्या. आता या सर्व कामांची जबाबदारी नवीन राजा चार्ल्स तिसरे यांच्याकडे असेल.

## भाद्रपदात कावळ्यांना विशेष महत्व

आधुनिक केसरी

वर्षभर हाक़लून लावणाऱ्या कावळ्याना भाद्रपदात विशेष महत्व असते जिथे जिवंत पणी अन्न मिळत नव्हत तिथे श्राद्धच्या दिवशी कावळ्याची वाट का बघितली जाते गरुड़पुराणानुसार पितृपक्षात श्राद्ध करायलाच पाहिजे आपल्या पूर्वजांची अशी अपेक्षा नसते की ताटभरून पंचपक्कावन्न मिळावे घरात जो स्वयंपाक केलाय ते पांच घास आगारीत टाकले जावे आणि त्यांचा आत्मा शांत व्हावा भाद्रपद पूर्णिमें पासून पितृपक्षास सुरवात होते प्रथमा, द्वितीय, तृतीया, चतुर्थी, पंचमी असे सर्वपित्री अमावस्या पर्यंत तिथिपूर्वक आपल्या मेलेल्या पूर्वजांचे विधिपूर्वक श्राद्ध करावे तरच त्यांना मोक्ष मिळतो शास्त्रात सांगितल्याप्रमाणे ही पूर्वज पितृपक्षात एका ठिकाणी जमतात आणि वाट बघतात की आज माझी मूल मला जेवनाचे ताट वाढून आणतील जे श्राद्ध आपण करतो घास आगारी टाकतो त्याचा धुर म्हणून त्या वासाने त्यांचे पोट भरते जे श्राद्ध करतात त्यांच्या पूर्वजांना ते ताट मिळत जे कोणी श्राद्ध करत नाही त्यांच्या घरुन काहीच येत नाही मग़ देव त्यांना बोलतो तु एवढ पण कमावल नव्हत का तुझ्या जिवंतपणी की तुला तुझ्या घरुन जेवण येइल आत्ता खा दगड़ माती तेव्हा तो आत्मा तळतळतो अन शाप देतो की त्या घरात कधी सुख शांति लागणार नाही आणि त्या घराला पितृदोष लागतो मग़ त्या घरात सतत दवाखाना, आजारपण, भांडण, कधी शांतता नसते मग़ जेव्हा ब्राम्हण सांगतो की घराला पितृदोष लागलाय तेव्हा पूजा पाठ करतात अरे तेव्हाच तु श्राद्ध केल असत तर आज तुला ब्राम्हणाला विचारायची गरज नसती पडली वर्षभर भूकेले असलेल्या आत्माला पितृपक्षात तरी खाऊ घालावे तेव्हा त्यांना मोक्ष मिळतो पितृपक्षात तिथिनुसार कैलेंडर मध्ये बघावे सकाळी लवकर उठून स्वयंपाक करावा, दाळ, भात,खीर,कढ़ी, चपाती, मसाल्याची आमटी, मुगाच्या ऐढण्या, उडीद दाळीचे वड़े, भजे, कुरडाई पापड़, असे जेवणात बनवावे मग़ दोन ताटात केळीचे पान ठेऊन सर्व थोड़े थोड़े पदार्थ वाढून त्यात एक लिंम्बाची फोड़, अदरकचा छोटा तुकड़ा, केळ असे सर्व पूजा करून एक ताट गच्चीवर ठेवावे दूसरे ताट टोपलीत थोडा जाळ करून त्याची पूजा करावी त्यावर एक एक घास टाकावे आणि चमचाने तूप टाकावे आणि गोलाकार पानी फिरवावे नंतर श्राद्ध ज्या व्यक्तिचे आहे त्या व्यक्तिच्या फोटो सामोर एक पान ठेऊन त्यावर पूर्ण जेवन वाढून विधिपूर्वक पूजा करून आपल्या पूर्वजाचे श्राद्ध करावे.हे सर्व बारा वाजेच्या आत केले तर उत्तम असते अशाने आपल्या पूर्वजाचा आत्मा शांत होतो .



कविता चव्हाण
संपर्क क्र. 9370062031

# शेतक-यांचे निसर्गाच्या प्रकोपामुळे नुकसान !

## "माय बाप सरकार आम्हाला मदत करा अशी दिली सरकारला आर्त हाक"

आधुनिक केसरी न्यूज



**देव्हारी :** सोयगांव तालुक्यातील मौजे डाभा येथे दि. ९ सप्टेंबर रोजी वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली. विजेच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडत होता.हा! हा! करता करता पावसाने रूद्र रूप धारण केले व जिकडे बघाव तिकडे, सागर तुंबल्या सारखी परिस्थिती निर्माण झाली. अशा अवस्थेमध्ये शेतक-याच्या तोंडी आलेला घास सोयाबीन, कापूस तूर, मका, बाजरी गहू, या पावसामुळे वाहुन गेले व अतोनात नुकसान झाले. त्या वेळेला शेतकऱ्यांनी शेतात जाऊन परिस्थिती पाहिली,अनेक शेतकऱ्यांनी ती परिस्थिती पाहून हंबरडा फोडला व म्हणाले "माय बाप सरकार, आम्हला मदत करा, "आम्हाला मदत करा अशी आर्त हाक देऊन हंबरडा फोडून सरकारला कळकळीची विनंती केली नऊ सप्टेंबर रोजी झालेल्या पावसामुळे डाभा परिसरामध्ये अतिशय चिंता जनक परिस्थितीचे चित्र पाहायला मिळाले, पिडीत शेतकऱ्यांना न्याय मिळेल का ? अशी अपेक्षा अनेक शेतकऱ्यांना लागली आहे.

**नुकसान झालेले शेतकरी**

(१)विलास रामभाऊ बावणे गट नंबर ७८ शिवार डाभा
(२) रुखमाबाई रामभाऊ बावणे गट नंबर ४० शिवार सावळदबारा
(३) मिराबाई दगडू डोकळे गट नंबर ४० शिवार सावळदबारा
(४) संदीप आत्माराम डोखळे
(५) बाळू नामदेव डोखळे
(६)शालिकराम संपत बावणे
(७) विष्णू बाळू डोखळे
(८)अनिता अनिल जाधव
(९) समाधान भिळा दांडगे
(१०) बाळू काशिनाथ दांडेगे

# 'या' देवस्थानाने सांगितला कोहिनूर हिऱ्यावर हक्क

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** ओडिशामधील एका संस्थेनं कोहिनूर हिऱ्यावर दावा केला आहे. भगवान जग्गनाथाची मालकी कोहिनूर हिऱ्यावर आहे असं या संस्थेचं म्हणणं आहे. श्री जग्गनाथ सेनेनं हा दावा केला असून ही संस्था ओडिशामधील पूरी येथे आहे. यासंदर्भात संस्थेनं राष्ट्रपती द्रौपदी मूर्म यांना पत्र लिहिलं असून त्यांनी मध्यस्थी करुन ब्रिटनच्या सरकारकडून कोहिनूर हिरा पुन्हा जग्गनाथ मंदिरामध्ये आणण्यासाठी मदत करावी अशी मागणी करण्यात आली आहे. पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार १०५ कॅरेटचा हा हिरा आता किंग चार्ल्स तिसरे यांच्या पत्नीला सुपूर्द केला जाणार आहे. मागील आठवड्यामध्ये ब्रिटनच्या महाराणी एलिझाबेथ दुसऱ्या यांचं निधन झाल्यानंतर त्यांच्याकडील हा हिरा आता त्यांच्या सूनबाई कॅमिला यांच्याकडे दिला जाणार आहे. राष्ट्रपतींना पाठवलेल्या पत्रात काय म्हटलंय?

"कोहिनूर हिऱ्याचे मालक श्री जग्गनाथ भगवान आहेत. तो हिरा सध्या इंग्लंडच्या महाराणीकडे आहे. आपल्या पंतप्रधानांना यासंदर्भातील पावले उचलण्याची विनंती करुन तो भगवान जग्गनाथांसाठी पुन्हा भारतात आणावा. महाराज रणजीत सिंग यांनी आपल्या वारसपत्रामध्ये हा हिरा जग्गनाथ देवस्थानाला दान केला होता," असं श्री जग्गनाथ सेनेनं राष्ट्रपती मूर्म यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. निधनानंतर १० वर्षांनी ब्रिटीशांनी ताब्यात घेतला हिरा श्री जग्गनाथ सेनेचे संयोजक प्रिय दर्शन पटनाईक यांनी केलेल्या दाव्यानुसार पंजाबचे महाराज रणजीत सिंग यांनी हा हिरा भगवान जग्गनाथाला दान केला होता. मात्र महाराज रणजीत सिंग यांचं १८३९ मध्ये निधन झाल्याने हा हिरा देवस्थानच्या ताब्यात देण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. हाच हिरा महाराजांच्या मृत्यूनंतर १८४९ साली ब्रिटीशांनी रणजीत सिंग यांचे पुत्र दुलीप सिंग यांच्याकडून बळजबरीने ताब्यात घेतल्याचा दावा श्री जग्गनाथ सेनेनं केला आहे. राजघराण्याने त्या पत्राला दिलं उत्तर

"त्यांना हा हिरा पुरी येथील जग्गनाथ देवस्थानाकडे दिला जाणार असल्याची कल्पना होती," असंही पटनाईक यांनी पीटीआयशी बोलताना म्हटलं आहे. यासंदर्भातील एक पत्र पटनाईक यांनी ब्रिटनच्या महाराणीलाही लिहिलं होतं. २०१६ साली ऑक्टोबर महिन्यामध्ये ब्रिटीश राजघराण्याचं वास्तव्य असणाऱ्या बकिंगहम पॅलेसमधून आलेल्या उत्तरामध्ये यासंदर्भात ब्रिटीश सरकारशी पत्रव्यवहार करावा असं पटनाईक यांना सांगण्यात आलं होतं. सध्या भारताच्या राष्ट्रपतींकडे करण्यात आलेल्या नव्या मागणीमध्ये बकिंगहम पॅलेसकडून आलेल्या पत्राच्या उत्तराची एक प्रतही जोडण्यात आली आहे.

म्हणून सहा वर्ष काहीच केलं नाही २०१६ ला पत्र मिळाल्यानंतर सहा वर्ष तुम्ही काहीही कारवाई किंवा मागणी का केली नाही असं विचारलं असताना पटनाईक यांनी आपल्याला ब्रिटनला जाण्यासंदर्भातील व्हिसा नाकारण्यात आल्याचं कारण सांगितलं.

## दुसरे पुण्यस्मरण



**स्व. कौसल्याबाई तात्यासाहेब जोगदंड**

आपल्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन

तुमचे असणं आमच्यासाठी सर्व होतं,
ते आमच्या आयुष्यातील सुंदर पर्व होतं...
आज सर्व काही असल्याची जाणीव आहे,
पण तुम्ही नाही ही मोठी उणीव आहे...

**शोकाकुल**

**बाळासाहेब जोगदंड आणि समस्त परिवार अंबाजोगाई**

# आदीवासी व मातंग समाजाच्या भांडणाला राजकीय वळण देऊ नका : डी.बी. वाघमोडे

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपुत**

**सोयगाव :** तालुक्यातील पळासखेडा येथे मातंग समाजाचे पंढरी म्हस्के यांचा मुलगा याचे व त्याच गावातील भिल्ल समाजाच्या लोकांसोबत काही किरकोळ कारणावरुन थोडा वाद झाला होता. त्यावेळेस पंढरी म्हस्के यांच्या मुलाला शिवीगाळ केल्याचे म्हस्के यांचे म्हणणे आहे. त्यांनी फर्दापुर पोलीस स्टेशनला सदरील घडलेल्या प्रकरणाबाबत तक्रार सुद्धा केली होती. त्याच तक्रारीची दखल घेऊन फर्दापुर पोलीस स्टेशनचे दबंग कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी आपल्या फौजफाट्यासह तात्काळ घटना स्थळावर भेट देऊन खरी वस्तुस्थिती पडताळणी केली. त्यावेळेस पंढरी म्हस्के यांच्या तक्रार अर्जानुसार पोलीसांनी आरोपीला ताब्यात घेऊन चौकशी केली. त्यामध्ये ज्या बौद्ध समाजाच्या इसमाचा काहीच संबंध नसतांना तो घटनास्थळी हजर नसताना पंढरी म्हस्के यांनी जाणीवपुर्वक त्याचे नाव तक्रार अर्जात नमुद केले होते. तेव्हा दबंग सहाय्यक पोलीस निरीक्षक डी.बी. वाघमोडे यांनी पुर्ण गोपणीय चौकशीनंतर त्या बौद्ध इसमाला सोडून दिले आणि जे कोणी गुन्हेगार होते. त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक सुद्धा केली.

साप्ताहिक आपले ज्ञानपंख या वृत्तपत्राच्या प्रतिनिधीने पळासखेडा गावातील या दोन समाजाच्या घडलेल्या प्रकरणाबाबत विचारपूस केली असता गावातील काही



लोकांनी असे सांगितले की, पंढरी म्हस्के यांच्या मुलांनीच त्या भिल्ल समाजाच्या मुलाला सर्वप्रथम काठीने मारहाण केली आणि तसे व्हिडिओ मध्ये सुद्धा स्पष्ट दिसत आहे ही वस्तुस्थिती असतात "उलटा चोर कोतवाल को दाटे" असेच म्हणावे लागेल उलट त्याच पंढरी म्हस्के यांनी या आदीवासी लोकांना विरुद्ध तक्रार केली त्याच्या तक्रारीची दखल घेऊनच सहाय्यक पोलीस निरीक्षक डी बी वाघमोडे यांनी कारवाई केली.

**मोटार सायकल वरुन पडलेल्या एका युवकांने केला मारहाण केल्याचा बनाव**

सदरील पळासखेडा येथे घडलेल्या पंढरी म्हस्के व भिल्ल समाजाच्या मारहाण प्रकरणात हॉस्पिटलमध्ये गळ्यात व हाताला पट्टी बांधून व डोक्यावर पट्टी लावून उपचार घेणारा हा इसम कोण हा तर त्या भांडणात नव्हताच पोलीसाला खब-याकडून जेव्हा माहिती मिळाली तेव्हा हा त्याच्या मोटारसायकल वरुन पडलेला आहे मात्र केवळ पोलिसांना जाणीवपुर्वक बदनाम करण्याचा प्रयत्न केल्या जात आहे.

**पोलीसांना काही सामाजिक संघटनानी पंढरी म्हस्के यांच्या तक्रारी संदर्भात फोन करुन केली जात आहे विचारणा**

पंढरी म्हस्के यांनी केलेल्या तक्रारी संदर्भात लहुजी संघर्ष सेना या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश बहिलम व राज्य युवक अध्यक्ष स्वप्नील सपकाळे यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक यांना फोन करुन खरी वस्तुस्थिती जाणून घेतली परंतु ह्या प्रकरणाला जाणीवपुर्वक जातीय वळण देऊन राजकीय व सामाजिक सलोखा बिघडण्याचे काम केल्या जात आहे. आमच्या प्रतिनिधीने सहाय्यक पोलीस निरीक्षक डी बी वाघमोडे यांची भेट घेऊन खरी परिस्थिती जाणून घेतली असता ते म्हणाले की, पळासखेडा येथे दोन समाजात घडलेल्या मारहाण प्रकरणाबाबत पोलीसांनी तात्काळ दखल घेऊन आरोपी विरुद्ध कायदेशीर कारवाई करुन आरोपींना अटक केली आहे.परंतु आमच्या पोलीसांच्या कार्यपद्धती वर जर कोणी सामाजिक संघटना संशय घेऊन आमच्या चौकशीत ढवळाढवळ करत असेल तर आम्ही कायदेशीर कारवाई करु अन्याय ग्रस्ताला न्याय व संरक्षण मिळायला पाहिजेत ते आम्ही करु तो त्यांचा हक्क आहे. परंतु पळासखेडा येथील प्रकरणाला जाणीवपुर्वक जातीय रंग देण्याचा प्रयत्न केला जात आहे. फर्दापुर पोलीस या प्रकरणात कुठेच कमी पडले नाही.कायदा हातात घेणा-यांवर निश्चितच कायद्यानुसारच कारवाई केली जाईल. तसेच कोणीही या प्रकरणाला राजकीय व सामाजिक वळण देऊन गावातील सामाजिक वातावरण दुषित करु नये असे सहाय्यक पोलीस निरीक्षक डी बी वाघमोडे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले.






# मोदी सरकारवर ताशेरे

आधुनिक केसरी

संसदेमधील आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाच्या स्थायी समितीने करोना कालावधीमधील मृत्यूंसंदर्भातील आपला अहवाल सादर केला आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने करोना कालावधीमध्ये ऑक्सिजनच्या तुटवड्यामुळे झालेल्या मृतांच्या संख्येची मोजणी करावी आणि मृतांच्या नातेवाईकांना नुकसानभरपाई द्यावी अशी शिफारस या अहवालामध्ये करण्यात आली आहे. सरकारने या विषयाकडे दुर्लक्ष केल्याबद्दल समितीने नाराजी व्यक्त केली आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने ऑक्सिजनच्या तुटवड्याआभावी खास करुन करोनाच्या दुसऱ्या लाटेच्यावेळी झालेल्या मृत्यूंची चौकशी करावी अशी शिफारस करण्यात आली आहे, असं या सामितीचं नेतृत्व करणारे समाजवादी पक्षाचने नेते राम गोपाल यादव यांनी आपल्या अहवालात म्हटलं आहे. यासंदर्भातील वृत्त एएनआय या वृत्तसंस्थेनं दिलं आहे.

मंत्रालयाने इतर राज्यांच्या सहकार्याने ऑक्सिजनच्या आभावी झालेल्या मृत्यूंच्या आकडेवारीचं ऑडीट करावं. कोविड मृत्यूचे दस्तऐवज जमा करुन यासंदर्भातील सविस्तर माहिती गोळा केल्याने सरकारची प्रतिसादात्मक यंत्रणा अधिक सक्षम होईल. त्याचप्रमाणे सरकार हे जबाबदारपणे काम करत असून धोरणात्मक सावधगिरीबद्दल गांभीर्याने विचार करत असल्याचं दिसून येईल. अशाप्रकारच्या आरोग्यासंदर्भातील परिस्थितीजन्य आणीबाणीचा सामना करण्यासाठी याची मदत होईल," असं अहवालात नमूद करण्यात आले आहे. सरकारी संस्थांकडून अधिक पारदर्शकता आणि अधिक जबाबदारीची अपेक्षा असल्याचे समितीने अहवालात म्हटले आहे. मंत्रालयाने ऑक्सिजनमुळे झालेल्या कोविड मृत्यूची बारकाईने तपासणी केली पाहिजे आणि पीडितांच्या कुटुंबीयांना योग्य नुकसानभरपाई दिली जाईल याची खात्री केली पाहिजे, असे त्यात म्हटले आहे. या स्थायी समितीमध्ये एकूण २७ खासादारांचा समावेश असून सर्वपक्षीय खासदार यात आहेत. महाराष्ट्रामधील अमोल कोल्हे, भावना गवळी, प्रितम मुंडे यासारखे खासदारही या समितीचे सभासद आहेत. "त्यावेळी रुग्णांच्या कुटुंबांनी ऑक्सिजनसाठी विनवणी केल्याची आणि ऑक्सिजन सिलिंडरसाठी रांगेत उभे राहण्याची अनेक उदाहरणे आहेत. जेव्हा हॉस्पिटलमध्ये केवळ काही तासांचा ऑक्सिजन पुरवठा शिल्लक होता त्यावेळी प्रसारमाध्यमांनी त्यावेळी हॉस्पिटल्समध्ये ऑक्सिजन संपत असल्याच्या तसेच यासंदर्भात मदत करण्याचं आवाहन करणाऱ्या बातम्या दिल्या होत्या. एप्रिल २०२१ मध्ये वैद्यकीय ऑक्सिजनच्या वितरणातील कथित गैरव्यवस्थापनासाठी दिल्ली उच्च न्यायालयाने दिल्ली सरकारला फटकारले. उच्च न्यायालयाने मे २०२१ मध्ये केंद्र सरकारला कोविड-१९ ची परिस्थिती सुधारत असलेल्या राज्यांमधून ऑक्सिजनचे टँकर दिल्लीकडे वळवण्यास सांगितले होते," असंही अहवालात नमूद करण्यात आलं आहे. याआधी, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने करोनाच्या दुसऱ्या लाटेदरम्यान ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे झालेल्या मृत्यूंच्या आकडेवारीसंदर्भात राज्ये तसेच केंद्रशासित प्रदेशांनी माहिती द्यावी अशी विनंती केली होती. यावेळी मिळालेल्या माहितीनुसार २० राज्ये तसेच केंद्रशासित प्रदेशांमध्ये ऑक्सिजनच्या तुटवड्यामुळे एकही मृत्यू झाला नाही असं समोर आलं होतं. मात्र आता, समितीने आपल्या निरीक्षणात, मंत्रालयाने राज्यांशी समन्वय साधला पाहिजे. ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे झालेल्या मृत्यूंचे ऑडिट करा, अशी शिफारस केली आहे.

# हिंदुस्थान नाही, भारतच...!



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**आज भारत देशाला मुद्दामहून धर्मीय भावनेतून हिंदुस्थान म्हटले जाते. यावरच राजकारण करून सर्वसामान्य माणसांची मती भडकावून समाजा समाजात भांडणे लावून मतांचे राजकारण केले जात आहे. अमेरिका, जर्मन, इंग्लंड या देशात जास्तीत जास्त मोठ्या प्रमाणावर ख्रिश्चन लोक आहेत. चीन, जपान यामध्येही बहुतांशी बौद्ध आहेत. परंतु हे असे असले तरी त्या देशांची नावे धर्मावरून नाहीत.धर्मवाचक नाहीत . सारे जग देशाला 'भारत ' म्हणूनच ओळखते. भारत या शब्दाला इतिहास आहे.मग या देशाला हिंदुस्थान म्हणणे व महाराष्ट्रात जिल्ह्याचे नाव बदलणे आणि त्यांचे हिंदूकरण करणे हे केवळ मतांसाठी राजकारण केले जात आहे.**

आजचे राजकारण इतके गढूळ झाले आहे की, त्यामध्ये नितळपणा, स्वच्छपणा आणि पारदर्शीपणा कुठेच दिसत नाही. खरे तर राजकारण हे देशाच्या, समाजाच्या आणि मानवी कल्याणाच्या उन्नतीसाठी करायचे असते. त्यातूनच मानवी कल्याण साधायचे असते. माणसांच्या मूलभूत गरजांची सुविधा उपलब्ध करून देऊन ज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, शेती, व्यापार व इतर क्षेत्रात भरभराट करायची असते. सत्तेचा उपयोग यासाठी करून देश महासत्ता बनवायचा असतो परंतु असे चित्र कुठेही दिसत नाही. उलट सत्तेचा उपयोग फक्त धर्मासाठी, हिंदुत्वासाठी लोकप्रतिनिधी करताना दिसून येतात. त्यामुळे समाजातील माणसांची माथी भडकली जातात. समाजा समाजात विषमतेची दरी निर्माण केली जाते. भारतीय संविधानाने एकमेकांना जोडलेल्या माणसांना त्यामुळे तोडले जाते. हे वाईट आहे. आज देशात महागाईने कळस गाठला आहे. सामान्य जनतेला जीवन जगण्यासाठी जीवघेणा संघर्ष करावा लागतो आहे. तरुणांच्या हाताला काम नाही. नोकर भरती बंद आहे. त्याही नोकऱ्या कमी केल्या जात आहेत. उद्योगधंदे बंद पडले आहेत. शेतकरी आत्महत्या करतो आहे. खाजगीकरणाकडे मोठ्या प्रमाणावर वाटचाल केली जात आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे शाळा महाविद्यालय बंद पडत आहेत. खाण्यावरही जीएसटी लावली जात आहे. आरोग्याच्या सोयी कुठेही मोठ्या प्रमाणावर उपलब्ध केल्या जात नाहीत. त्याही फार महाग आहेत. अशा अनेक गोष्टींनी सामान्य जनतेला सत्ताधाऱ्याकडून खूप छळले जाते आहे. याविषयी कोणताही लोकप्रतिनिधी आवाज उठवताना दिसत नाही.त्याविषयी बोलत नाही. उलट राजकारणी, लोकप्रतिनिधी मात्र जनतेला भावनिक बनवून, त्यांच्या फक्त मतावर डोळा ठेवून हिंदुत्वाच्या नावाखाली त्यांना एक करून देशाची वाट लावताना दिसत आहेत. खरे तर हिंदुत्व पेक्षाही जनतेला सुविधा मिळणे, त्यांचे रक्षण करणे, त्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे हे महत्त्वाचे आहे परंतु त्याकडे प्रचंड दुर्लक्ष करून, डोळे झाक करून केवळ हिंदुत्वाचा मुद्दा पुढे करून दलित, आदिवासी, शेतकरी मुस्लिम यांना टार्गेट करून सामान्य जनतेला दबावाखाली ठेवण्याचे कारस्थान सत्तेत असणारे सरकार करताना दिसत आहे. खरे तर भारताचा विकास हिंदुत्वामुळे किंवा धर्मामुळे होणार नाही. होत नसतो.हिंदुत्वामुळे सामान्य माणसाचे जीवनमान उंचावणार नाही किंवा त्यांचे पोट भरणार नाही तर त्यांना विविध सुविधा देणे गरजेचे आहे. या सुविधा देण्याचे कार्य मात्र कोणतेही लोकप्रतिनिधी मनापासून करताना दिसत नाहीत. उलट भारत देश कसा कंगाल होईल, गरीबी जास्तीत जास्त कशी येईल, लोकांना जाती, धर्माच्या नावाखाली बांधून गुलाम कसे करता येईल यासाठी सत्तेचा जोरदारपणे उपयोग केला जात आहे. हे भारताचे दुर्दैव आहे असे म्हणायला हरकत नाही. भारताने 26 जानेवारी 1950 पासून संविधान स्वीकारले आहे. आपल्या देशात लोकशाही नांदते आहे. संविधानातही 'आम्ही भारताचे लोक' म्हणून उल्लेख आहे. संविधान मंजूर करणारे संविधान सभेत सर्वच विविध जाती धर्माची विद्वान मंडळी होती. त्यांनी भारत व भारतीय हे शब्द मान्य केले आहेत. देशाची ओळख आजही भारत म्हणूनच जगासमोर आहे. या देशात विविध धर्माची लोक राहतात. हिंदु, मुस्लिम,शीख, बौद्ध, जैन, ख्रिश्चन अशी विविध धर्माची माणसे चांगली राहतात. मग या देशाला हिंदुस्थान कसे म्हणता येईल ?तरी काही जात्यांध आणि धर्मांध राजकारणी, लोकप्रतिनिधी भारत देशाला हिंदुस्थान म्हणत असून एकमेकांच्या मनात राग, वैर,द्वेषभावना निर्माण करत आहे. भारतीय संविधानाचे सर्वधर्मसमभाव हे तत्व झुगारून देत आहेत. हे अंत्यंत चुकीचे आहे. असे म्हटले जाते की, जैन अनुक्श्रुतीनुसार भगवान ऋषभ देवाच्या ज्येष्ठ पुत्राचे नाव भरत होते. प्रसिद्ध राजा दुष्यंत याचा पुत्र भरत हा चक्रवर्ती राजा होता. या राजांच्या नावावरून आपल्या देशाचे नाव भारत पडले असे म्हटले जाते.



हा इतिहासाचा आधार आहे. असे म्हणतात की, जे जे हिंदूंचे धर्मग्रंथ आहेत त्यामध्येही हिंदुस्थान हा शब्द दिसत नाही. सिंधू नदीच्या मुखाजवळील सिंधू प्रदेशात राहणाऱ्या लोकांसाठी तो सिंधू शब्द वापरला. सिंधूंचा अपभ्रंश हिंदू आहे असे म्हटले जाते. त्यावरूनच हिंदुस्थान हा शब्द वापरला जातो. आज हिंदुत्व नावाच्या शब्दाभोवती देशाचे राजकारण करून विषमता निर्माण करून समाजा समाजामध्ये तेड निर्माण केली जात आहे त्यामुळे मानवता नष्ट होताना दिसत आहे. हे देशाच्या दृष्टीने घातक आहे. आज देशात रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, जात, धर्म, देव, दानव यांचे मोठ्या प्रमाणावर स्तोम माजवून सामान्य माणसाला पुन्हा अज्ञानाच्या खाईत लोटले जात आहे. छत्रपती शिवाजी महाराज,म. जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवलेला शिक्षणाचा, प्रगतीचा, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायाचा मार्ग हे आजचे लोकप्रतिनिधी रोखताना दिसत आहेत. सामान्य माणूस संपून टाकण्याचा जणू त्यांनी वीडाच उचलला आहे असेच दिसते. आज रोज टी.व्ही समोर येताना आम्ही हिंदुत्वासाठी जगतो आहोत,हिंदुत्वासाठी एकत्र आलो आहोत किंवा भारत नव्हे हिंदुस्थानाच असा फुत्कारा सोडला जात आहे. लोकशाहीचा आधारस्तंभ असणारे वृत्तपत्रही, चॅनेलही त्यांच्या वाईट गोष्टींनाच प्रसिद्धी देताना दिसत आहेत. हेही वाईट आहे. कुणी भोंगे काढायला सांगतात तर कुणी हर घर तिरंगा लावायला सांगतात. सामान्य जनतेच्या उन्नतीसाठी, हितासाठी, मानवी कल्याणासाठी मात्र कुणीही बोलताना दिसत नाही. हे अत्यंत वाईट आहे. त्यांच्या करणी आणि कथनी मध्ये फरक आहे. रोज लोकशाहीची हत्या केली जात आहे.

लोकशाहीची शपथ घेऊन देशाचा गाडा हाकणारे लोकप्रतिनिधी लोकशाहीची गळचेपी करत आहेत. सामान्य जनतेची फसवणूक करत आहेत. विकासाच्या नावाने दिशाभूल करत आहेत. हे महाभयानक वास्तव आहे. दलित, आदिवासी, भटके विमुक्त, व इतरांची प्रगती भारतीय संविधानाने आणि शिक्षणाने झाली आहे. तीच प्रगती आज अनेकांच्या डोळ्यात खूपत आहे. संविधानाच्या अधिकारामुळे तो समाज लिहू लागला, बोलू लागला, अधिकार आणि हक्क विषयी जागरूक होऊ लागला, आपले स्वतःचे अस्तित्व निर्माण करू लागला, विविध पदावर पोहोचू लागला, हक्काची आणि न्यायाची भाषा करू लागला हेच नेमकं त्यांच्या प्रचंड जिव्हारी लागत आहे. म्हणूनच पुन्हा ते चातुवर्णव्यवस्था आणु पाहत आहेत. हे सर्व सुशिक्षित, दलित, आदिवासी,भटके, विचारवंत, लेखक यांनी लक्षात घेऊन भारत घडवण्याचा प्रयत्न करायला हवा. वाईट गोष्टींना विरोध करायला शिकले पाहिजे. अन्याय, अत्याचाराच्या विरुद्ध लढले पाहिजे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना ही वस्तुस्थिती सांगायला हवी नाहीतर येणारा काळ आपल्याला माफ करणार नाही. ढोंगी, संधीसाधू आणि स्वार्थासाठी राजकारण करून सत्ता हस्तगत करून जनतेची दिशाभूल करणाऱ्या लोकप्रतिनिधींनाही सामान्य जनतेने धडा शिकवणे महत्त्वाचे आहे. आम्ही इंग्रजांच्या पारतंत्र्यातून फार मोठ्या कष्टाने, बलिदानाने स्वातंत्र्य मिळवले आहे परंतु आज आमचेच लोकप्रतिनिधी आमचीच माणसे आम्हाला इंग्रजापेक्षाही हीन वागणूक देऊन सर्वसामान्य जनतेचे स्वातंत्र्य हिरावून घेत आहेत हे सामान्य जनतेने वेळीच ओळखायला हवे. ज्यांना आम्ही आमचा विकास करण्यासाठी देशाचे भवितव्य घडविण्यासाठी मत दिले आहे, निवडून दिले आहे तेच मात्र स्वार्थासाठी, जात, धर्मासाठी, भ्रष्टाचारासाठी, काम करताना दिसताहेत . सामान्य जनतेला वाऱ्यावर सोडून दिले आहे. तेही त्यांच्या स्वार्थासाठी, सत्तेसाठी, मंत्री पदासाठी विकले जात आहेत. स्वतःचे अस्तित्व गहाण ठेवत आहेत. संस्कारहीन बनत आहेत. रोज वेगवेगळ्या थापा मारत आहेत. मग हे लोकप्रतिनिधी जनतेचे हित काय साधणार ? त्यांच्याकडून काय शिकण्यासारखे आहे ?त्यामुळे सामान्य जनतेने महागाई कशी दूर होईल, तरुणांना नोकऱ्या कशा मिळतील, मूलभूत सोयी कशा निर्माण करता येतील, शिक्षण, ज्ञान, उद्योग, आरोग्य यांच्या सोयी आम्हाला कशा मिळतील यासाठी लोकप्रतिनिधींना जाब विचारून न्याय मागणे गरजेचे आहे. जातीय, धर्मीय व केवळ फक्त हिंदुत्वाच्या राजकारणात न अडकता देशहित आणि समाज हित साधने गरजेचे आहे नव्हे काळाची गरज निर्माण झाली आहे. हा देश हिंदुस्थान नाही,भारत आणि भारतच आहे.

# एक पत्र 'बाप्पासाठी'



प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

आधुनिक केसरी

**प्रिय बाप्पा, आता तू घरी पोहचला असशीलच. आता तुझा प्रवास कसा झाला हे काही मी विचारणार नाही, छानच झाला असेल तू गेल्यानंतर तुझा रिकामा मखर पाहून डोळ्यांना आसवांचा पूर आला होता. तुझ्या सोबत घालवलेला दहा दिवसाच्या क्षणांचा फुलोरा आता माझ्या डोळ्यासमोर नाचत होता. माझे मन अगदीच त्रासून गेले होते, कशातही मन लागेनासे झाले होते; पण पुन्हा तू सांगितलेले शब्द आठवले आणि मग अश्रू पुसून कामाला लागले. तू येणारच आहे पुढल्या वर्षी लवकर हे मला माहीत आहे. आणि पुढल्यावर्षी तुझं स्वागत नक्की मोठ्या उत्साहाने करायचे आहे.**

तू सांगितलं तसं सारं काही पूर्ण करण्याचा मी प्रयत्न करणार आहे. फक्त प्रयत्न नाही तर मी ते सत्य करणार आहे.आणि यात तू माझ्या सोबती राहणार आहे असं तुझं ही वचन आहेच. बाप्पा या दहा दिवसाच्या उत्सवात तू कितीतरी गोष्टी शिकवतो. एकोप्याने जगणं पदार्थाची जिन्नस, आनंदाची ओंजळ हे सारं काही. दरवर्षी नवं काहीतरी ओंजळीत असतं ते फक्त तुझ्या कृपेने खरंतर तू असताना कोणत्याही कामात कितीही विघ्न आली तरी ती आपसूक दूर होतात. नवा मार्ग मिळतो. दरवर्षी तुझं येणं मनाला सुखवून जातं. प्रत्येक माणसात सामर्थ्य पेरण्याचे काम तू करत असतोस. तू नेहमी पाठीशी उभा असतो म्हणून तुझ्यासोबत कितीकाही मनमोकळेपणाने बोलता येते. चौसष्ट कलेचा अधिपती आहेस तू आणि तू विद्यापती आहेस. बाप्पा ही संस्कृती किती न्यारी आहे म्हणजे आजीकडून आईकडे आणि आईकडून मुलांकडे परंपरेचा गोडवा वाटला जातो तो जपला जातो. मंगळागौर पूजा, नैवेद्य नव्या पदार्थाची जिन्नस, ढोल ताशे, मिरवणूक, मंडळाचे उत्सव हे सारंकाही गेली दोन वर्ष बंद होतं. कवाडे बंद करून बाहेरच जग पहायचो तेव्हा यातनेने मन होरपळून निघायचे. कधी संपतील हे दिवस असं वाटायचं पण आता शेवटी या दोन वर्षानंतर हे सारंकाही खुल झालं. पुन्हा नवा उत्साह अंगी भरून सारे जोमाने कामाला लागले. नवी ऊर्जा, नवं चैतन्य हे सारंकाही किती सुरेख दिसत होतं. यातून एक गोष्ट आम्हा सर्वांना कळाली ती म्हणजे दुःख आणि संकटांचे ढग कितीही काळे जरी असले तरी तुझ्या शक्तीच्या



तेजाने तो अंधःकार दूर होऊन तेथे आशेचा प्रकाश पडतोच हेच खरं आहे.

बाप्पा दरवर्षी तुझं आगमन आम्ही असंच मोठ्या थाटाने करत राहू असाचं आशीर्वाद आम्हांला दे आणि येणाऱ्या संकटाशी लढून जिंकण्याचे सामर्थ्य ही बहाल कर. तसं तू तुझ्या भक्तांच्या मागे सदैव असतो हे आम्हा माहीत आहे. तू आम्हांवर येणाऱ्या विघ्नांचा नाश करशीलच यात तिळमात्र शंका नाही. तसं देवघरात तुझी पूजा अर्चना रोजचं होत राहील. तू दूर नाही जवळचं आहेस. एका रूपाने जरी गेलास तरी दुसऱ्या रूपाने तुझे अस्तित्व कायम राहीलच; पण तरीही तुझ्यासोबत एकदा मनमोकळ बोलावं वाटलं म्हणून हे पत्र नव्या गोष्टी शिकण्याचं सामर्थ्य तू आम्हा प्रदान कर.

ही परंपरा आणि संस्कृती हिची जपवणूक आमच्याकडून व या पुढल्या पिढीकडून होऊ दे बाप्पा आजही समाजातनवे बदल दिसत आहे. आजची पिढी ही आधुनिक होत आहे त्यामुळे त्यांना या साऱ्या गोष्टी आवडत नाही किंवा त्यांना त्याचे महत्त्व देखील पटलेले नाही पण मला विश्वास आहे. प्रत्येकाने जरी आपल्या मुलांना आणि नातंवडांना ह्या गोष्टीचे महत्त्व सांगितले तर ते त्यांना नक्कीच कळेच. आजवर जपून ठेवलेली संस्कृती पुढेही जपू असा विश्वास तुला देते आणि थांबते. ते ही पत्र फार मोठे होऊ नये म्हणून माझ्या भावना नक्की तुझ्यापर्यंत पोहचतील. असा विश्वास आहे.

कळावे,

**तुझीच भावना.**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# हिंदी है हम



व्यंकटेश देवनपल्ली
संपर्क : 9535022112

आधुनिक केसरी

**भारताच्या २२ अधिकृत भाषा आहेत. १६५२ बोली भाषा आहेत तथापि १५० भाषा बोलणारे बहुसंख्य भाषिक आहेत. भाषावार प्रांतरचनेनुसार निरनिराळ्या राज्यांत निरनिराळ्या भाषा अधिकृत राज्यभाषा म्हणून ओळखल्या जातात. या पार्श्वभूमीवर आपल्या भावभावनांच्या अभिव्यक्तिसाठी, विचारांच्या देवाणघेवाणीत सगळ्याच भारतीयांना जोडणारी एक विशिष्ट भाषा नको काय? म्हणूनच या सर्व भाषांना एकत्र बांधून ठेवणारा धागा म्हणून देशात सर्वाधिक बोलली जाणारी हिंदी भाषा राष्ट्रभाषा म्हणून स्वीकारलेली आहे. काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत कुठेही गेलो तरी भाषेची अडचण यायला नको म्हणून एक राष्ट्र, एक भाषा ही संकल्पना स्वीकारायला हवी.**

१४ सप्टेंबर १९४९ रोजी संविधान सभेने देवनागरी लिपीतल्या हिंदी भाषेला भारत सरकारची राजभाषा म्हणून मान्यता देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. या निर्णयाचे महत्व प्रतिपादित करण्यासाठी म्हणून १४ सप्टेंबर हा दिवस हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो. हिंदी या आपल्या राष्ट्रभाषेविषयी प्रत्येक भारतीयाला कर्तव्याची आठवण करून देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

आपला भारत देश म्हणजे जणू सुरांनी सजलेली एक सतार आहे. अन त्या सतारीतून उमटतात विविध भाषांचे मनोहर सूर, तरंग.... या विविध भाषांच्या सुरावटीतच तीन धर्मांच्या भक्ति भावनांचा संगमही आपल्याला पाहायला मिळतो. आज आम्हाला परदेश भ्रमण करता येत नसेल पण जमेल तेवढी भारत भ्रमंती तरी करू, या अशा प्रामाणिक हेतूने प्रवासाला निघणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. परंतु प्रवासाला निघताना मात्र परक्या राज्यात आपणाला लोकांशी संवाद साधता येईल की नाही याची एक अनामिक भीती आमच्या मनांत दडलेली असते. भारताच्या २२ अधिकृत भाषा आहेत. १६५२ बोली भाषा आहेत तथापि १५० भाषा बोलणारे बहुसंख्य भाषिक आहेत. भाषावार प्रांतरचनेनुसार निरनिराळ्या राज्यांत निरनिराळ्या भाषा अधिकृत राज्यभाषा म्हणून ओळखल्या जातात. या पार्श्वभूमीवर आपल्या भावभावनांच्या अभिव्यक्तिसाठी, विचारांच्या देवाणघेवाणीत सगळ्याच भारतीयांना जोडणारी एक विशिष्ट भाषा नको काय? म्हणूनच या सर्व भाषांना एकत्र बांधून ठेवणारा धागा म्हणून देशात सर्वाधिक बोलली जाणारी हिंदी भाषा राष्ट्रभाषा म्हणून स्वीकारलेली आहे. काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत कुठेही गेलो तरी भाषेची अडचण यायला नको म्हणून एक राष्ट्र, एक भाषा ही संकल्पना स्वीकारायला हवी.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी मूठभर नेत्यांच्या सहभागाने काही होणार नाही तर त्यासाठी साऱ्या देशबांधवांचा सहभाग हवा. भारतीयांच्या जनमानसात चैतन्य फुंकण्यासाठी हिंदी भाषाच सर्वथा योग्य आहे हे महात्मा गांधीनी वेळीच ओळखले होते. इ.स १९१८ साली भरलेल्या हिंदी साहित्य संमेलनात गांधीजीनी हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचे स्थान मिळावे असे म्हटले होते. आज स्वातंत्र्याची सत्तरी ओलांडल्यानंतर देखील राष्ट्रभाषा हिंदीला अजूनही काही प्रांतांतून विरोध झेलावा लागतो. अर्थात दक्षिणेतील तामिळनाडू, केरळ आणि कर्नाटक या प्रांतातून हिंदी भाषेला विरोध केला जातो. बेंगलुरू येथील मेट्रोवर इंग्रजी, हिंदी व कन्नड ही त्रिभाषिक लावलेली पाटी होती. अचानक एके दिवशी सकाळी हिंदी भाषेत लिहिलेली ओळ वाचता येऊ नये म्हणून त्यावर पांढरी पट्टी लावलेली होती. त्याचबरोबर हे इंग्रजी प्रेम पाहा, मध्यंतरी केरळ प्रांतातल्या एका गृहस्थाने दावा केला की विल्यम शेक्सपियर हा केरळचा रहिवासी होता. त्याचे मूळ नांव विल्यम शेषप्पा अय्यर होते. तो नंतर विल्यम शेक्सपियर झाला. आपल्या दाव्याची पुष्टी करताना ते म्हणतात की बघा ना, आम्ही लोक जगाच्या पाठीवर कुठेही जायला तयार असतो. यातला विनोदाचा भाग सोडा.

परकीय भाषेतल्या लोकांच्या विषयी एवढी आत्मीयता दाखवणारे आम्ही, आपल्या स्वकीय भाषांच्या विषयी एवढे उदासिन का? हिंदी भाषेचा सर्वार्थाने स्वीकार करावा असे म्हणताना, प्रादेशिक भाषेकडे दुर्लक्ष करा किंवा इंग्रजी भाषा शिकू नये असे म्हणणे शहाणपणाचे ठरणार नाही. आजघडीला विज्ञानातील प्रगती जाणून घेण्यासाठी आणि विविध देशांतर्गत विचारांच्या देवाणघेवाणीसाठी इंग्रजी भाषेला सुध्दा सोडून चालणार नाही. त्याच पध्दतीने आपल्या विविध भाषी देशबांधवाना समजून घेण्यासाठी हिंदी भाषेसारखा घट्ट धागा सापडणार नाही. पंधराव्या शतकात या हिंदी भाषेच्या द्वारेच भक्तिचा जो स्रोत ओसंडून वाहत होता त्यामुळेच संपूर्ण उत्तर भारत प्रेम आणि शांत रस यांत डुंबलेला होता. तुलसीदास, सूरदाससारखे द्रष्टे कवी या देशाला लाभले. विविध प्रांतातील विचारांच्या आदानप्रदानासाठी हिंदी भाषा एक दुवा म्हणून नक्कीच पर्यायी ठरू शकेल इतके सामर्थ्य त्या भाषेत आहे. सेवानिवृत्तीनंतर हिंदी विषयात एम.ए. चा अभ्यास करताना हे माझ्या पुरेपुर लक्षात आलेले आहे.

हिंदी साहित्यातील सर्वश्रेष्ठ कादंबरी निवडायची म्हटल्यावर, यशपाल यांनी लिहिलेली 'झूठा सच' ही कादंबरी नजरेसमोर येते. उच्च कोटीतील ही कादंबरी 'वतन और देश' आणि 'देश का भविष्य' अशा दोन भागांत लिहिलेली आहे. देशाचे विभाजन आणि त्याचे परिणाम याचे अतिशय प्रामाणिकतेने चित्रण करणारे कथानक यात आहे. हिंदी भाषेतील प्रसिध्द कादंबरीकार प्रेमचंद यांच्या कालजयी कादंबऱ्या 'गोदान', गबन, प्रेमाश्रम आणि सेवासदन, हजारीप्रसाद द्विवेदी यांची बाणभट्ट की आत्मकथा, फणीश्वरनाथ रेणू यांची मैला आँचल, मंजूर एहतेशाम यांनी लिहिलेली 'सूखा बरगद' असे एक ना अनेक कादंबऱ्या वाचायला मिळाल्या.

मूळ हिंदी साहित्यासोबतच विविध भाषिक विख्यात लेखकांच्या कादंबऱ्या वाचण्याचे सौभाग्य हिंदी भाषेमुळेच प्राप्त झाले, हे इथे नमूद करावेसे वाटते. स्व. महाश्वेता देवी यांची कादंबरी 'अरण्येर अधिकार' (जंगल के दावेदार). ही कादंबरी म्हणजे ब्रिटिश साम्राज्यवादाच्या विरुद्ध आदिवासी लोकांनी केलेल्या सशक्त बंडाची रोमहर्षक महागाथा आहे, या कादंबरीचे महानायक बिरसा मुंडा आहेत. चेम्मीन (कोळी) ही मलयालम भाषेतील साहित्यिक तकषी शिवशंकर पिळ्ळै द्वारा लिखित ही एक तटवर्ती प्रदेशातल्या मासेमारी करणाऱ्या लोकांच्या दैनंदिन जीवनावर



प्रभाव टाकणाऱ्या अंधविश्वासावर आधारित अशी ही एक अत्यंत यथार्थ चित्रण करणारी कादंबरी आहे. कन्नड कादंबरीकार स्व. यू. आर. अनंतमूर्ति द्वारा लिखित 'संस्कार' ही कादंबरी ब्राह्मणवाद, अंधविश्वास आणि परंपरागत संस्कार यांच्यावर अप्रत्यक्षपणे कठोर प्रहार करणारी ही कथा आहे. इ.स. १९०० साली गुजरात येथील भयंकर दुष्काळाची पार्श्वभूमी लाभलेली मानवीनी भवाई (जीवन एक नाटक) ही कादंबरी मनाचा ठाव घेते. सांगायचा मुद्दा हा आहे की या सर्व कादंबऱ्यांचे हिंदी रूपांतरण उपलब्ध नसते तर या महान साहित्यकृती वाचण्याचे भाग्य या आयुष्यात कधीच मिळाले नसते. यात सगळ्यात महत्वाचे काय असेल तर या कादंबऱ्या वाचताना हिंदी भाषेचे बोट धरून मी छोटा नागपूरच्या आदिवासींच्या जंगलात, केरळच्या समुद्र किनारी, कर्नाटकातल्या ब्राह्मण गावात आणि गुजरातच्या दुष्काळ पीडित गांवात उन्मुक्त संचार करत होतो. भाषेच्या माध्यमाचा मला कुठेच अडथळा येत नव्हता. माझ्या मनात तेच भावतरंग उमटले जे भाव त्या त्या भाषेतल्या वाचकांच्या मनात उमटले असतील. हे तर स्पष्ट आहे की त्याचे मूळ कारण सशक्त कथावस्तुच असणार आहे, तरी देखील अनुवाद करणाऱ्या लेखकांचे ही तेवढेच कौशल्य आहे हे मानावे लागेल.

संस्कृत भाषेतील कित्येक सामान्य शब्द जे घराघरात योजले जातात उदा. सुख दुःख, माया, प्रेम, प्रीति, कलह, पाप, पुण्य असे अनेक शब्द हिंदी भाषेत सर्रास आढळतात. हिन्दी भाषेला फारसी किंवा अरबी शब्दांना आपल्यात सामावून घ्यायला जराही संकोच वाटत नाही. ही त्या भाषेची प्रवृत्ती आहे. हिंदी भाषा बोलणारे त्रेपन्न टक्के असून देखील वास्तविकता ही आहे की अधिकतर भारतीय इंग्रजीच्या मोहपाशात पूर्णपणे जखडले गेले आहेत. आज आपल्याकडे इंग्रजी भाषेबद्दलचे प्रेम वाढत चालले आहे. भारतात इंग्रजी बोलणाऱ्यांचे प्रमाण बारा टक्के आहे तरी देखील जवळपास सरकारी व निमसरकारी तसेच कंपन्यांच्या दरम्यान होणारा बहुतेक पत्रव्यवहार इंग्रजीतच होतो. मोठ्या शहरात इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे प्रमाण वाढत चालले आहे ही वस्तुस्थिती आहे. इंग्रज गेले तरी त्यांच्या भाषेचा पगडा आमच्यावर जबरदस्त आहे. दुकानांच्या, हॉटेलच्या पाट्या, रेस्टॉरंटमधले मेनूकार्ड इंग्रजीतच असतात. आता हेच पाहा ना, हॉटेल, रेस्टॉरंट व मेनूकार्ड या शब्दांना माझ्याकडे पर्यायी मराठी शब्द नाहीत. समजा शोधून योजले असते तरी मला काय म्हणायचे आहे ते कुणाला कळलेही नसते. नित्योपयोगी उपकरणांची नांवे त्यांच्या वापर करण्याविषयीच्या सूचना या इंग्रजीतच असतात. इंग्रजी भाषा जणू आपल्या मानगुटीवर बसलेली आहे. हिंदी असो वा प्रादेशिक भाषा केवळ नांवापुरते किंवा दाखवण्यापुरते राहिले आहे.

सध्याच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांतून आम्ही आमच्या मुलांना आपल्या भारतीय संस्कृतीच्या ज्ञानापासून वंचित करत आहोत आणि समाजातल्या लोकांच्या दरम्यान एक प्रकारची सामाजिक व वैचारिक दरी उत्पन्न करीत आहोत. लोकांना त्यांची भाषा, त्यांची संस्कृती यापासून दूर लोटत आहोत असे वाटते. इंग्रजी हीच सर्वश्रेष्ठ भाषा आहे असे ठसवत आपण लोकांच्या मनात आपल्या भाषेप्रती हीनभावना निर्माण करीत आहोत, हे योग्य नाही. वेळ निघून जाण्याच्या आधीच ही परिस्थिती बदलायला हवी. हिंदी दिवस केवळ एक सरकारी सोपस्कार आहे असे समजून केवळ एक दिवस साजरा करून चालणार नाही. आपली मातृभाषा, आपली प्रादेशिक भाषा सुदृढ बनवतानाच त्यांना आपली राष्ट्रभाषा हिंदीचे महत्व पटवून द्यायलाच हवे. क्या समझे?

# सेंद्रिय शेतीसाठी घ्या सिक्कीमचा आदर्श



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**रासायनिक खतांच्या वाढत्या किंमती आणि कीटकनाशकाच्या दुष्परिणामुळे शेतकरी पुन्हा नैसर्गिक शेतीकडे आकर्षित होत आहे. देशातल्या अनेक प्रांतांमध्ये आज हजारो शेतकऱ्यांनी जैविक शेतीचा स्वीकार केला आहे व त्याची यशस्वीतता समोर ठेऊन त्याची गरजही जगाला पटवून दिली जात आहे. यासाठी राज्य सरकारेही उत्तेजन देत आहेत, की ज्याची नितांत गरज आहे. जर रासायनिक खतांचा वापर टाळून जैविक खतांचा वापर वाढवला गेला तर त्याचा मानवालाच नव्हे तर पर्यावरणालाही चांगला फायदा आहे.**

राज्य सरकारे रासायनिक खतांच्या वापरासाठी सबशिडी देत आहेत, यातून राज्य सरकारांची सुटका होईलच, शिवाय या खतांच्या वापरामुळे जमिनी नापिक होण्यापासून आणि धोक्यात येत असलेले मानवाचे आरोग्य त्याच्या दुष्परिणांपासून यांचा वाचवता येईल. जैविक खते आर्थिकदृष्ट्याच नव्हे तर पर्यावरणाच्यादृष्टीनेही आपल्या प्रचंड लाभाचे आहेत.

भारतात अगदी प्राचीन काळापासून नैसर्गिक किंवा सेंद्रिय शेती केली जाते. भारतातील सेंद्रिय शेतीचे मॉडेल पाहूनच सर आल्बर्ट हॉवर्ड यांनी 'ॲग्रीकल्चर टेस्टांमेंट' हे पुस्तक लिहिले व त्याला जगभर मान्यता मिळाली. पूर्वापार शेतामध्ये पालापाचोळा, शेणखत कुजवून सेंद्रिय खताचा वापर केला जात असे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यावेळी असणाऱ्या 35 कोटी लोकसंख्येची भूक भारतीय शेती भागवत होती. त्या काळात उपलब्ध असणारी शेतजमीन ,मशागतीच्या पद्धती, सिंचन सुविधा यावरच हा देश समृद्ध होता. भारतामधून निर्यात होणारे मसाल्याचे पदार्थ तर साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेत होते.

गेल्या 75 वर्षांत लोकसंख्येची प्रचंड वाढ झाली. ही वाढ स्वातंत्र्य मिळाल्यावर दहा वर्षांतच लक्षात आली होती. एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या पूर्वीच्या शेती पद्धतींमधून पुरेसे अन्न मिळणार नाही म्हणून 1960 च्या दशकात हरितक्रांतीचा उद्घोष सुरू झाला. आपण हायब्रीड बियाणांचे तंत्रज्ञान स्वीकारले. हायब्रीड बियाणे उत्पादन जास्त देतात, म्हणून आपण स्वीकारले. परंतु त्यांची जमिनीतून अन्नद्रव्ये, पाणी शोषून घेण्याची क्षमता जास्त असते. ही बियाणी खादाड असतात. त्यांची भूक भागवण्यासाठी जमिनीतील सर्व 16 मूलद्रव्यांचा पुरवठा चढता चढता ठेवावा लागतो. तरच उत्पादन अपेक्षेप्रमाणे येते. त्यामुळे जमिनीला रासायनिक खतांच्या मात्रा सुरू झाल्या. सर्व कृषितज्ज्ञानी जमिनीला शेणखत द्या आणि या नव्या बियाण्यांसाठी रासायनिक खते द्या असे सुचवले. साहजिकच उत्पादन प्रचंड वाढले हे काय वेगळे सांगण्याची गरज नाही. लागवडीचे क्षेत्र वाढले.

खरे तर, रासायनिक खतांचा वापर सुरू झाल्यानंतर अधिक उत्पादनाच्या अमिषापोटी त्याचा अतिवापर वाढत चालला. त्यामुळे त्याची जमिनींना सवय होऊ लागली. माणसाला दारूच्या व्यसनाची जशी चटक लागते तशी, जमिनीला या रासायनिक खतांची चटक लागली. पण 'अति तिथे माती' या उक्तीप्रमाणे शेतकऱ्याच्या अन्नात माती कालवण्याचे काम ही रासायनिक खते करू लागली. मातीचे आरोग्य बिघडू लागले. केवळ मातीवरच नव्हे तर खाद्य-पदार्थांच्या उत्पादनावरही त्याचा विपरित परिणाम होऊ लागला. त्याच्या स्तरात घट येऊ लागली. त्यामुळे आता शेतीतील मातीचे आरोग्य कसे शाबूत राहिल आणि रासायनिक खतावर सबशिडीच्या रुपाने होणारा कोट्यावधीचा खर्चही कसा वाचवता येईल, या प्रश्नाचे उत्तर जैविक शेतीच देऊ शकते, हे आता अनुभवावरून लोकांना कळू लागले आहे.

रासायनिक खतांमुळे पिकांमध्ये असमतोल निर्माण झाला. त्यांच्यावर किडी, रोगांचे हल्ले सुरू झाले. त्याला तोंड देण्यासाठी विषारी कीडनाशके, बुरशीनाशके यांचा वापर सुरू झाला.गेल्या 60 वर्षांत या रासायनिक शेतीचा शेतीचा भस्मासुर सर्व निसर्गावर , समाजावर, प्राणीमात्रांवर अत्यंत विपरित परिणाम करत आहे. मानवी आरोग्यावर आणि जमिनीच्या आरोग्यावर मोठा परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी जमिनींची वाटचाल नापिकीकडे होत आहे. प्रदूषणात भर पडत आहे. रासायनिक शेतीमधील उत्पादन बेचव , निकृष्ट व विषयुक्त आहे. या दृष्टचक्रातून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणजे नैसर्गिक किंवा सेंद्रिय शेती.



शेणखताला पर्याय म्हणजे हिरवळीचे, पाळापाचोळ्याचे ,काडीकचऱ्याचा खत म्हणून पुनर्वापर हा आहे.

2003 मध्ये सिक्कीमच्या पवन चामलिंग सरकारने विधानसभेत एक प्रस्ताव पास करून राज्याला 'जैविक राज्य' म्हणून पुढे आणण्याचा संकल्प सोडला. यासाठी सिक्कीम सरकारने पहिल्यांदा काय केले असेल तर , ते म्हणजे संपूर्ण राज्यात रासायनिक खते व कीटकनाशक औषधांच्या विक्रीवर बंदी घातली. त्याची अंमलबजावणी कड्कपणे केली. यानंतर राज्यातल्या जवळपास 400 गावांना 2009 पर्यंत 'जैविक गाव' बनविण्याचे लक्ष्य ठेवले. नंतर राज्य सरकारने 50 हजार हेक्टर जमीन जैविक शेतीमध्ये रुपांतरित करण्याचा सपाटा चालवला. पूर्ण इच्छाशक्तीने राज्य सरकारने त्यात स्वतः ला झोकून दिले. या प्रयत्नांचा परिणाम असा झाला की, राज्यात वनस्पती खते तयार करणाऱ्या 24 हजार 536 संस्था तर गांडूळ खताच्या 14 हजार 487 संस्था उभा राहिल्या आणि त्या पुऱ्या जोमाने काम करू लागल्या आणि आज त्या ते काम करीत आहेत.

या प्रयत्नांमुळे 2009 पर्यंत सिक्कीममध्ये जैविक शेतीचा विस्तार सहा हजार हेक्टरपर्यंत पोहोचला होता. त्यात सतत वाढ होत असून तिथल्या आठ हजार शेतकऱ्यांनी आतापर्यंत जैव शेतीचे प्रमाणिकरण मिळवले आहे. सध्याची परिस्थिती पाहिली तर 2015 पर्यंत सिक्कीममधील 50 हजार शेतकरी जैवशेती करताना दिसतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे. सिक्कीमचा आदर्श संपूर्ण देशाने अगदी गंभीरपणे घेतल्यास आपल्या देशाचे एक चांगले चित्र जगासमोर येईल. शिवाय आपली भावी पिढी रसायनमुक्त अन्नाचे सेवन करील आणि बिघडलेल्या पर्यावरणाला आवरही घालता येईल.

सिक्कीम राज्याने शास्त्रीय पद्धतीने रासायनिक शेती कमी करून सेंद्रिय शेती वाढवली. या राज्यात अल्पभूधारक शेतकरी जास्त असल्यामुळे येथे सेंद्रिय शेती यशस्वी झाली. राज्यात गायराने मुबलक आहेत. जंगल क्षेत्र वाढले आहे. यामुळे हिमालयातून पाणी आले तरी राज्याने केलेल्या अशा छोट्या छोट्या उपाययोजणांमुळे बहुतांश पाणी भूगर्भात मुरले जाते. परिणामी या राज्यातील नद्या बारमाही वाहतात. राज्यातील शेतकरी आनंदी, सुखी आणि समाधानी दिसतो. अर्थात हिमालयामध्ये होणाऱ्या घडामोडींचा या चिमुकल्या राज्यावर नक्कीच परिणाम होत आहे. मात्र त्यांनी त्यासाठी सुरू केलेल्या उपाययोजना तितक्याच महत्त्वाच्या आहेत. सिक्कीमने वातावरण बदलाचे संकट 20 वर्षांपूर्वीच ओळखले होते. वातावरण बदलासह हिमालयीन घडामोडींपासून संरक्षणासाठी हे राज्य संपूर्ण सेंद्रिय आहे.

सिक्कीममधील लोकांनी सगळाच भार शासनावर टाकला नाही. उलट अशा कामांसाठी शासनाच्या मदतीवर अवलंबून राहण्याची गरज नसते. तेथील गावकरी ग्रामपंचायतीकडे ठराविक रक्कम जमा करतात. गावपातळीवर पर्यावरण सुदृढतेवरही काम झाले आहे. यामध्ये त्या गावांमध्ये सौरऊर्जेचा वापर, पावसाचे पाणी जमा करणे, अभ्यासपूर्ण पद्धतीने रासायनिक खत वापरणे, जीवाश्म इंधनाचा गरजेपुरता वापर, गाव परिसरात मुबलक वृक्ष लागवड, स्वच्छता, प्लास्टिक बंदी, कचराकुंड्या, ओला कचरा व्यवस्थापन, पाण्याचा काटेकोरपणे वापर, गावाचा हरित कोश, कुऱ्हाड बंदी आणि नागरिकांमध्ये वातावरण बदलाबाबत जागरूकता अशा अनेक घटकांवर तिथे काम झाले आहे. सिक्कीम राज्य छोटे आहे,त्यामुळे सगळी राज्ये नैसर्गिक शेतीयुक्त होतील म्हणणे हा भाबडेपणा झाला,पण तरीही सेंद्रिय वाढली पाहिजे. आज सेंद्रिय धनधान्य, फळफळावळे यांची मागणी प्रचंड प्रमाणात आहे. ही मागणी आपण पूर्ण केली पाहिजे.

# भारत जोडो : एक राजकीय स्टंट



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

**ज्या भूभागावर गवताची काडी उगवत नाही ती जमीन चीनने घेतली तर एव्हढे दुःख का कारायचे ? असे निवेदन संसदेत करणारे देशाचे पंतप्रधान कुठल्या पक्षाचे आणि कुठल्या घराण्याचे होते ? आसामच्या जनतेला देवाच्या हवाली आणि नशिबावर सोडून देणारे नेते कुठल्या पक्षाचे होते ? परकीय घुसखोर बांगलादेशी आणि अलीकडील रोहिंगे याना पाठीशी घालत त्यांना नागरिकत्व बहाल करणाऱ्या संस्कृतीचे वारसदार भारत जोडो यात्रा काढत आहेत यासारखी फसवणूक कुठली नसेल.**

सध्या देशात काँग्रेस च्या राजपुत्राच्या भारत जोडो यात्रेचे बँड वाजत आहेत . खरे तर भारत तोडो वाल्या सर्व प्रकारच्या वृत्तीना ज्यांच्या शासकीय कार्यकाळात प्रोत्साहन मिळाले तेच भारत जोडो यात्रा काढत आहेत हा एक मोठा विनोद म्हणावा लागेल ! पण असा विनोद देश आणि देशातील जनता यांच्याबद्दल घडतो तेंव्हा तो विनोद क्रूर वाटायला लागतो.

देशाच्या स्वातंत्र्य लढ्यानंतर ज्या नेत्यांनी काँग्रेस पक्षाचे आणि देशातील सत्तेचे नेतृत्व केले त्यांनीच खंडित स्वातंत्र्य मिळवताना देशावर फाळणी लादली. निरपराध नागरिक, स्त्री पुरुष धर्मांध मुस्लिम समाजाच्या अत्याचारांना बळी जात होते त्यावेळी ही मंडळी इंग्रजांशी वाटाघाटी करत होते. प्रथम देश तोडला तो काँग्रेसच्याच नेतृत्वाने ! खंडित भारतातील काश्मीरचा भूभाग भारतापासून तुटला आणि pok निर्माण झाला ! ज्यांच्या स्वप्नाळू वृत्तीने स्वतंत्र भारताच्या तुकडे पडण्यास सुरुवात झाली त्यांचेच पारिवारिक, पक्षीय, राजकीय वारसदार आज भारतजोडो चे नाटक करत आहेत ! स्वतंत्र भारतात फुटीरतेची बीजे काश्मीर मध्ये रोवली गेली , वाढत गेली त्यात महत्वाची भूमिका बजावणारे अब्दुल्ला परिवार हे काँग्रेस चे खानदानी मित्र ! ३७० कलमा सारखे असंवैधानिक कलम आणले कुणी ? सातत्याने काश्मीर मधील भूभाग भारतापासून वेगळा करू इच्छिणाऱ्या मंडळींची पाठराखण कुणी केली ?

पंजाब मध्ये अकाली दलाचा पराभव करण्यास उपयोगी म्हणून भिंद्रानवाले कुणी उभा केला? खलिस्तान चळवळी ची पाळेमुळे तेथे त्यावेळी कुणी रोवण्यास मदत केली ? नुकत्याच घडवून आणलेल्या किसान आंदोलनात खलिस्तानी चळवळीतील पैसा आणि सहभाग यासाठी फूस कुणाची होती ?

ज्या भूभागावर गवताची काडी उगवत नाही ती जमीन चीनने घेतली तर एव्हढे दुःख का कारायचे ? असे निवेदन संसदेत करणारे देशाचे पंतप्रधान कुठल्या पक्षाचे आणि कुठल्या घराण्याचे होते ? आसामच्या जनतेला देवाच्या हवाली आणि नशिबावर सोडून देणारे नेते कुठल्या पक्षाचे होते ? परकीय घुसखोर बांगलादेशी आणि अलीकडील रोहिंगे याना पाठीशी घालत त्यांना नागरिकत्व बहाल करणाऱ्या संस्कृतीचे वारसदार भारत जोडो यात्रा काढत आहेत यासारखी फसवणूक कुठली नसेल.

दीर्घकाळ पूर्वांचल क्षेत्र विकासापासून वंचित ठेवत मिशनऱ्यांना मोकळे रान देत तो भूभाग भारतापासून तोडण्याच्या अवस्थेत नेण्याचे पाप कुणाचे ? वनवासी भागात विकास खुंटवताना नक्षलवादी चळवळ कोणाच्या सत्तेच्या काळात फोफावली ? शहरी नक्षलवादी लोकांना मानाच्या विचारवंतांच्या रांगेत बसवून पुरस्कार प्राप्त कोणी केले ? टायगर मेनन , अफजल गुरू , बुऱ्हाण वाणी , इशरत जहाँ यांच्या नावाने गळे काढणारे कोण होते ? समझोता एक्सप्रेस , हैद्राबाद बॉम्ब , मालेगाव बॉम्ब या घटनेतील खरे आरोपी मोकाट सोडून हिंदू दहशतवाद नावाचा भ्रम कोणी निर्माण केला ? भारत जोडो यात्रेचे नाटक करणाऱ्यांना याचे उत्तर आधी द्यावे लागेल.

प्रशासकीय सोय आणि सांस्कृतिक वारसा या आधारावर राज्यांची निर्मिती करण्याऐवजी भाषावार प्रांत रचना ज्यांनी आणली त्यातून भाषेच्या अहंकाराचे कंगोरे जपले, वाढवले आणि भारत तोडो मंडळींना आयते कोलीत ज्या पक्षाने दिले ते आज भारत जोडो यात्रा काढत आहेत!

गेल्याच वर्षी अमेथी येथून वायनाड ला पळून आलेल्या राजकुमाराने दक्षिण आणि उत्तर असा वाद निर्माण होणारे प्रक्षोभक वक्तव्य केले होते . संपूर्ण भारताला जोडणाऱ्या प्रभू रामचंद्र या राष्ट्र पुरुषाचे अस्तित्व नाकारणारे कोण होते ? व्यापारी हेतू साठी राम सेतू उध्वस्त झाला तरी चालेल ही भूमिका कुणाची ? छत्रपतींना वाट चुकलेला म्हणणारे ज्यांचे पूर्वज ते आज भारत जोडो यात्रा काढत आहेत.

या भारत जोडो यात्रेची सुरुवात राजकुमाराने ज्या चर्च च्या प्रमुखांच्या आशीर्वादाने सुरू केली ते पास्तर जॉर्ज महाशय आपल्या प्रक्षोभक वक्तव्यासाठी प्रसिद्ध आहेत . मोदी / अमित शहा याना किडे मकोडे , कुत्रे चावतील अशी त्यांची धारणा आहे . कन्याकुमारी जिल्हा ७० टक्के ख्रिश्चन करण्याचे त्यांचे स्वप्न आहे . भारतमाता हा एक रोग आहे असे त्यांचे म्हणणे आणि त्यामुळे काही रोग न होण्यासाठी बूट वापरले पाहिजे असा त्यांचा सल्ला आहे . तामिळनाडू सरकार त्यासाठी फुकट बूट मोजे वाटत आहे असे त्यांचे म्हणणे आहे . त्यांच्या आशीर्वादाने ही सुरू झालेली भारत जोडो यात्रा भारत तोडो या उद्देशाकडे न्यायचा हेतू आहे का अशी शंका यावी असे सगळे चालू आहे.

या भेटीत देव फक्त येशूच्या रुपात आहे असे सेमेटीक वक्तव्य त्यांनी केले शक्ती च्या रुपात देव हे थोतांड आहे असे त्यांचे म्हणणे आहे ! मग कामाख्या पासून पावगड आणि दुर्गामाते पासून मीनाक्षी / कन्याकुमारी ही ६४ शक्तिपीठे राहुल गांधी यांना थोतांड वाटतात का याचे उत्तर या भारत जोडो यात्रेत त्यांना द्यावे लागेल !

आज तर काँग्रेस पक्षाच्या अधिकृत ट्विटर हँडलवर संघाची पूर्वी गणवेश असलेली खाकी विजार प्रतिकात्मक दाखवत येत्या १४५ दिवसात हा विचार आम्ही जाळून टाकणार अशी शेखी मिरवली गेली आहे.

अर्थात जाळपोळ, दंगल ही आजची काँग्रेस संस्कृती नाही ती जुनी आहे. गांधी हत्या, इंदिरा गांधी हत्या आशा अनेक प्रसंगात हिंदू , शीख याना जाळणारे आणि दंगली घडवणारे दुसरे काय स्वप्न बघू शकणार ? अर्थात हे सगळे जोडण्याच्या नावाखाली याना जाळायचे आहे.

संघ विचार हा संघाचा विचार नाही तर या भारत वर्षाचे चिरंतन सत्य आहे . या विचाराला आजच्या काँग्रेसच्या राजकुमाराच्या मागील तीन पिढ्यानी संपवण्याचा प्रयत्न केला . सत्तेच्या बळावर दमन चक्र चालवत , बंदी घालून ,गावोगावी संघकार्यकर्त्यांवर अत्याचार करून संघाला संपवण्याचे सर्व प्रयोग अयशस्वी ठरले आहेत हा गृहपाठ राजकुमार आणि त्यांच्या चमच्याने नीट न केल्याने ते असले वाह्यात ट्विट करत असावेत.

संघ राजकीय संघर्षात सहभागी होत नाही , तशी संघाची इच्छा पण नाही ! काँग्रेस मुक्त भारत व्हावा का ? तर पूजनीय सरसंघचालकानी याचे उत्तर दिले आहे ,संघाला कुणाला मुक्त करून भारत घडवायचा नाही . पण संघाला वैचारिक लढ्यासाठी कुणाशीही संघर्ष करायची वेळ आली तर संघ त्यासाठी तयार आहे . वेळ पडल्यास देश हितासाठी संघ राजकीय व्यवस्था बदलून टाकण्याइतकी क्षमता बाळगून आहे . जे जे संघ विचाराच्या आड आले , ज्यांनी संघाला संपवण्याचे स्वप्न पाहिले ते कालबाह्य होत गेले पण संघ ९७ वर्षे आपली दमदार यात्रा आपल्या ध्येयाच्या अंतिम टप्प्या पर्यंत घेऊन आला आहे.

वैचारिक लढाई अवश्य लढा पण जाळण्याची भाषा आता विसरून जा. जागृत आणि जागरूक हिंदू समाज आता एकवटला आहे. त्याला आपले हित , देश हित कशात आहे हे चांगले समजले आहे. आलिशान सुखसोयींनी परिपूर्ण रथात बसून राजकुमार फिरणार !

आणि भारत जोडो चा संकल्प करणार ! विरोधी विचाराला जाळण्याची भाषा बोलणार ! जनतेला सर्व समजते आहे.

हा भारत हजारो वर्षांपूर्वी सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या आधारावर भक्कम पणे जोडलेला आहेच. काशीचा बाबा विश्वनाथ , रामेशवरचा रामेश्वर द्वारकेचा द्वारकधीश आणि पुरीचा जगन्नाथ या सांस्कृतिक प्रतिकाना छेद देऊन भारत कसा जोडला जाईल? या सांस्कृतिक धरोवरेने आतापर्यंत भारत इतके आक्रमण होऊन ही एकसंघ राहिला.

चर्चचे आशीर्वाद, मौलवींची दुवा आणि कन्हैया सारखे भारत तेरे तुकडे होंगे आशा घोषणा देणारे सहकारी यातून एक राजकीय स्टंट होईल आणि अर्थात तो स्टंट अपेक्षित राजकीय यश पण देणार नाही . हे कळण्याइतकी बुद्धिमत्ता राजकुमाराच्या कडे असण्याची शक्यता कमीच! तूर्तास १४५ दिवस करमणूक कराशिवाय मनोरंजन करून घेण्यास हरकत नाही !



# मांसाहार समज-गैरसमज आणि विपर्यास



भिमराव परघरमोल
मो.9604056104

आधुनिक केसरी

**भारतीय संविधानाने देशवासीयांना विविध प्रकारचे मूलभूत स्वातंत्र्य तथा हक्क अधिकार बहाल केलेले आहेत. ते म्हणजे अभिव्यक्ती, धर्म, वास्तव्य, व्यवसाय, सभा-संघटन सोबतच आहार, विहार तथा मुक्त संचार इत्यादींचा त्यामध्ये समावेश आहे. त्यामुळे कोणी काय खावे? काय खाऊ नये? हा ज्याचा त्याचा व व्यक्ती स्वातंत्र्याचा भाग ठरतो. तरीही देशातील काही भागात मांसाहाराबद्दल अनेक प्रकारचे समज-गैरसमज निर्माण करून त्याबद्दल विपर्यास पसरवल्याचे दिसून येतात. त्यामागची कारणमीमांसा विवेचित करण्यासाठीच हा लेखन प्रपंच!**

मांसाहार म्हणजे नेमकं काय? तर आहारामध्ये मांस, मासे, अंडी, चिकन, मटन, यांचा समावेश असणे होय. तर ज्यांच्या आहारामध्ये यापैकी समावेश असतो त्यांना मांसाहारी असे म्हटले जाते. जीवसृष्टीतील काही प्राणी मांसाहारी काही शाकाहारी तर काही मिश्राहारी आहेत. मांसाहारी प्राण्यांच्या दातांपासून तर पचनक्रियेपर्यंतची रचना ही विशिष्ट पद्धतीची असते. त्यांना सुळे दात असतात, जे त्यांना शिकार करण्याच्या कामी येतात. तसेच त्यांच्या आतड्यांची रचना आणि लांबी सुद्धा मर्यादित असते, जेणेकरून सेवन केलेले मांस जास्त वेळ त्यामध्ये साठवून राहणार नाही. अन्यथा त्याची कुजण्याची, सडण्याची प्रक्रिया सुरू होऊन पचनक्रियेला अपाय होण्याची शक्यता असते. शाकाहारी प्राण्यांना सुळे दातांऐवजी पटासीचे दात असतात, ज्यामुळे त्यांना गवत, कंद-मुळांसह तृणं दातात पकडून, तोडून किंवा उपटून खाणे सोपे होते, तर पचनसंस्थेची रचनाही लांबलचक असते. तरीही त्यामधून खाद्यांनाचा प्रवास हा सहज, सुलभ आणि गतीने होतो. मिश्राहारी प्राणी मात्र दोन्ही प्रकारचे खाद्यान्न सेवन करतात. परंतु त्यामध्ये मानवप्राणी हा मांसाहारी, शाकाहारी की मिश्राहारी याबद्दल मात्र मोठ्या प्रमाणात मतभेद आहेत. परंतु माणसाला पटाशीचे आणि सुळे असे दोन्ही प्रकारचे दात आहेत. म्हणून तो मिश्राहारी असावा असा कयास असला, तरी पचनक्रियेची रचना मात्र शाकाहारी प्राण्यांसारखी असल्याची दिसून येते.

मानवी उत्पत्तीचा काळ, म्हणजे मानवी जीवनाला स्थैर्य नसताना जेव्हा तो भटकंती करून आपली दिनचर्या चालवत होता. त्यावेळी त्याने मांस, मासे, फळे, कंदमुळे, पालापाचोळा हे सर्वकाही कच्चंच सेवन केल्याच्या पुरातत्वीय नोंदी दिसून येतात. परंतु उन्हाळ्याच्या दिवसात जंगलाला आग (वनवा) लागल्यामुळे भाजल्या गेलेली जनावरे, फळे, कंदमुळे, यांची चव त्याच्या जिभेला विशेष भावली. त्यामुळे अग्नीचा शोध लागल्यानंतर तो भटका मानव कच्चं खाण्याऐवजी त्याला हवं ते स्वतःहून भाजून खाऊ लागला. जसजसा मानवी मेंदू विकसित झाला तसतसा तो खाण्यापिण्यासंबंधीही जागृत आणि विकसित झाला. भटक्या अवस्थेमध्ये सर्व पदार्थ कच्चे खाणारा मानव आज काही अपवाद वगळता प्रत्येक पदार्थ भाजून, शिजवून, वाफवून किंवा चुरून तसेच त्यावर वेगवेगळी प्रक्रिया करून, विविध मसाले लावून, त्यामध्ये विविध पाचक रस मिसळून, त्याला आपल्या अनुकूल बनवून खाऊ लागला. त्यामुळे त्याची पचनक्रिया ही मांसाहारी आहे की शाकाहारी? हा प्रश्नच उरला नाही.

भारतीय समाजव्यवस्था ही अनेकांगाने रूढी-परंपराप्रिय असल्याचे दिसून येते. परंतु त्यामागील कोणताही कार्यकारणभाव समजून न घेता त्याचे पालन तथा वहन करण्यातच ती धन्यता मानताना दिसते. त्यापैकी एक म्हणजे श्रावणमासी मांसाहार न करणे. श्रावणामध्ये बरेच लोक मांसाहार टाळताना दिसतात. परंतु आधी आणि नंतर त्याची कसर भरुनही काढतात. श्रावणामध्ये मांसाहार का करू नये? असे एखाद्याला विचारल्यास वैज्ञानिक बैठक असणारे उत्तर मिळणे मात्र दुरापास्तच! श्रावण हा मोठ्या प्रमाणात पावसाचा महिना असून नियमीत ढगाळ वातावरणामुळे पृथ्वीला सूर्याचा प्रकाश कमी प्रमाणात मिळतो, हवा दमट झालेली असते, त्यामुळे भोवतालीच वातावरण दूषित होऊन सगळीकडे घाणीचे साम्राज्य पसरलेले असते. मांसावर घोंगावणाऱ्या माशांच्या प्रादुर्भावामुळे जंतुसंसर्ग होऊन रोगराईला आमंत्रण मिळते. सोबतच मानवी पचनक्रियाही मंदावलेली असते. तसेच तोच काळ प्राण्यांच्या गर्भधारणेचा व गर्भावस्थेचाही असल्यामुळे निसर्गातील प्राण्यांचे प्रमाण कमी होऊन त्यांची अन्नसाखळी खंडित होऊ नये म्हणूनही मांसाहार टाळणे अपेक्षित असते.

आता रूढी परंपरा जरी बाजूला ठेवल्या , तरी एक प्रश्न शिल्लक राहतोच, तो म्हणजे मांसाहार योग्य की अयोग्य? मांसाहार अयोग्य म्हटल्यास? तोच एक प्रथिनांचा, खनिजांचा व जीवनसत्वांचा भला मोठा स्त्रोत असल्यामुळे त्याचा आहारामध्ये समावेश करण्याचा सल्ला राज्यांसह केंद्राचाही अभ्यासक्रम वर्षानुवर्ष मुलांना देत आला आहे. भारतामध्ये असणाऱ्या साडेसहा हजार जातींपैकी एखादी जातच कदाचित पूर्णपणे (१००%) शाकाहारी असल्याचे दिसून येईल. एका पाहणीनुसार (सर्व्हे) भारतातील ८४ टक्के लोक मांसाहार करतात. मांसाची निर्यात



सुद्धा भारतामधूनच मोठ्या प्रमाणात होऊन त्यापासूनच बऱ्यापैकी गंगाजळी मिळते. काही निर्यातीचे व्यवसाय उच्चभ्रू तथा उच्च जातीय लोकांचेच असल्याचे दिसून येतात.

एवढेच नव्हे तर,पौराणिकते कडे वळल्यास ऋग्वेदामध्येही मांसाहाराचे उल्लेख आढळतात. प्राचीनकाळी यज्ञामध्ये बळी दिलेल्या जनावरांचे मांस चवीने खाल्ले जायचे, असा उल्लेख डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या एका पुस्तकात केलेला आहे. मनुस्मृतीमधील एका उल्लखानुसार, आपल्या पित्रांना (मृत पूर्वज) स्वर्गामध्ये बारा वर्षांपर्यंत जागा मिळवायची असेल तर, पाणी पिताना ज्या बोकडाचे कान पाण्याला टेकतात त्याच्या मांसाचे ब्राह्मणभोज घालावे. वाल्मिकी रामायणासह विविध प्राचीन धर्मग्रंथांमध्ये देव देवतांच्या मांसाहारचे अनेक उल्लेख आढळतात. तथागत गौतम बुद्ध सुद्धा मांसाहारासंबंधी आपले मत व्यक्त करताना म्हणतात की,' मनुष्य मांसाहाराने अशुद्ध तथा अपवित्र होत नाही, तर तो कुविचाराने, दुसऱ्याला दुःख दिल्याने, चोरी केल्याने, व्यभिचार केल्याने, असत्य वाणीने, चुगली-चहाडीने, लबाडीने, भांडणं लावण्याने किंवा मेंदूवरचा ताबा सुटणाऱ्या पदार्थांचे (दारू) सेवन केल्याने मनुष्य अशुद्ध अथवा अपवित्र होतो.

याचाच अर्थ असा की, पौराणिक तथा ऐतिहासिक काळापासून तर आजपर्यंत मांसाहाराला धार्मिक तथा वैज्ञानिक दृष्टिकोनातून मान्यता असल्याचे दिसून येते. तरीही आपल्याकडील काही लोक बुद्धिभेद करताना दिसतात. मांसाहार तामसी आहार आहे, तो केल्याने माणूस क्रोधीष्ट बनतो, अपवित्र तथा अशुद्ध होतो, ज्ञानार्जन करण्यास तो अयोग्य असतो असा गैरसमज पसरवण्यामध्ये इथली विषमतावादी, मनुवादी व्यवस्था यशस्वी झालेली आहे. पाश्चात्य देशात मात्र सर्वाधिक मांसाहारा केला जातो. त्याकडे ते लोक फक्त अन्नपदार्थ म्हणून पाहतात, त्यामुळे त्यांची बुद्धिमत्ता, कद-काठी, ज्ञान-विज्ञान, संशोधन, खेळ तथा विविध क्षेत्रातील नेत्रदीपक प्रगतीसह मानवी मूल्यांच्या अंमलजावणीत ते अग्रेसर आहेत.

भारतामध्ये एखादा सुटाबुटातील व्यक्ती शहाणपणाच्या काही गोष्टी सांगत असेल तर त्याच्या जातीसह खाण्यापिण्याकडे लक्ष वेधून त्याचं मानसिक खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला जातो. काहीना तर मांसा-मांसा मध्येही फरक दिसतो. त्यांच्यासाठी संत कबीर म्हणतात की,

मांस-मांस सब एकही है ।
मुर्गा बकरा गाय ।
असा मानव चुतीया ।
बडा प्रेम से खाये ।

अशाप्रकारे फक्त आपल्याच देशात मांसाहाराला दोष देवून मांसाहारींना कमी का लेखले जाते? किंवा मूळ मांसाहारी लोकांनी तो बंद का केला असावा? आज जरी त्याचे वेगवेगळे संदर्भ सांगण्यात येत असले, तरी बुद्धाच्या अहिंसा तत्वाला मात देऊन आपली हिंसावादी प्रतिमा उजळ करणे हाच त्यामागचा एकमेव आणि मूळ उद्देश असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर एका ठिकाणी नमूद करतात. त्यामुळे आहारामध्ये कशाचा समावेश असावा? किंवा असू नये? ही बाब दुय्यम ठरते. तसे स्वातंत्र्य सुद्धा भारतीय संविधानाने प्रत्येकाला बहाल केलेले आहे. म्हणून निर्दोष जीवन जगण्यासाठी बुद्धाचा विशुद्ध मार्ग समजून घ्यावा व आपले जीवन शुद्ध, पवित्र आणि सुखमय करावे, एवढेच!

# प्रशासकीय मनमानीविरुद्ध वीज कामगारांच्या द्वारसभा

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** महावितरणने कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक यांच्या हक्काच्या सुट्ट्यांवर गंडांतर आणले आहे. यानिषेधार्थ महाराष्ट्र वीज कामगार महासंघाच्या वतीने महाराष्ट्रभर द्वारसभा घेऊन प्रशासनाचा निषेध करण्यात आला. औरंगाबाद येथे परिमंडळ कार्यालयाच्या आवारात द्वारसभा झाली. महावितरण ही एक शासकीय कंपनी असून या कंपनीत कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी सेवाविनियम आहेत या सेवाविनियमानुसार कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या सेवा सुविधा मिळत असतात. यातच त्यांच्या कामाचे तास, सुट्ट्या यांचाही अंतर्भाव असतो परंतु महावितरण प्रशासन सध्या कंपनीचे सेवाविनियमाचा स्वतःच भंग करत आहे व त्यानुसार मिळणाऱ्या सुविधा या काढून घेण्याचा घाट सध्या महावितरण मध्ये सुरू आहे. नुकतेच महावितरण कंपनीने एक प्रशासकीय परिपत्रक निर्गमित केले व या माध्यमातून कंपनीत कार्यरत कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक यांच्या हक्काच्या सुट्ट्यांवर गंडांतर आणले. यावेळी अरुण पिवळ (प्रदेश महामंत्री) यांनी सांगितले की, कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक यांच्या साप्ताहिक सुट्ट्या, व सार्वजनिक सुट्ट्या नव्याने निर्धारित करण्याचे प्रशासकीय परिपत्रक नुकतेच निर्गमित करण्यात आले. हे मूळतः नियमबाह्य असल्याने त्वरित मागे घेण्यात यावे अशी आग्रही मागणी करण्यात आली. सेवाविनियम एकतर्फी बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापनास नाहीत. महावितरण कंपनीला औद्योगिक विवाद कायदा लागू असून नोटीस ऑफ चेंज न देता कामगारांना सेवाविनियमानुसार प्रदान केलेल्या सवलती अशा एका प्रशासकीय परिपत्रकाने काढून घेता येत नसतात व हा अधिकार प्रशासनास नाही. श्री.पिवळ यांनी सांगितले हे पद निर्माण का झाले, यांच्या कामाचे स्वरूप काय हे जाणून न घेताच हे परिपत्रक काढल्याचे स्पष्ट होत आहे. जर प्रशासनास काही अडचणी होत्या तर त्या अडचणीबाबत व्यवस्थापनाने संघटनेसोबत चर्चा करणे आवश्यक होते. त्यावर योग्य तो मार्ग निघू शकला असता. कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक हे अतांत्रिक पद आहे. वास्तविक शाखा कार्यालयात कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक हे कोणतेही तांत्रिक काम करत नाहीत. त्यामुळे त्यांचे काम हे अत्यावश्यक सेवेत येत नाही. परिपत्रकात नमूद शनिवार आणि साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी त्यांची उणीव भासते आणि शनिवारीच कार्यालयास भेट देणाऱ्या ग्राहकांची संख्या जास्त असते असे परिपत्रकात नमूद करणे खेदजनक आहे. जे शाखा कार्यालय महापालिका कार्यक्षेत्रात अंतर्गत अस्तित्वात आहेत त्या ठिकाणी हे पद वेतन गट चारमध्ये मंजूर करण्यात आले आहे. सदर पद हे सेवाविनियमाच्या परिशिष्ट-ग मध्ये मोडते म्हणून सदर पदास कारखाने अधिनियम लागू होत नाही. असे असताना देखील एकतर्फी बदल करून कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक यांच्यावर अन्याय करण्यात आलेला आहे. या अन्यायाची भावना कर्मचाऱ्यांमध्ये तयार झाल्याने संपूर्ण महाराष्ट्रभर महाराष्ट्र वीज कामगार महासंघाने सदर परिपत्रकाचा निषेध करत परिपत्रक रद्द करण्याची मागणी केली.

सदर परिपत्रक रद्द न केल्यास व्यापक आंदोलन करण्यात येईल अशा इशारा यावेळी देण्यात आला व परिपत्रकाचा निषेध नोंदविण्यासाठी महाराष्ट्रभर द्वारसभा घेण्यात आल्या. औरंगाबाद येथे द्वारसभेस श्री. बापू शिंदे (केंद्रीय कार्यालय मंत्री) श्री. बाबुराव शिंदे (जिल्हा प्रभारी) श्री. तुषार भोसले (प्रा.अध्यक्ष) श्री. डी. एस. जैवल (प्रा.संघटन मंत्री) श्री. डी. बी. हातकगणे (प्रा. कोषाध्यक्ष) श्री. दादाराव वाघमोडे (झोन अध्यक्ष) श्री. वाल्मिक निकम (झोन सचिव) सौ. रसिका कुलकर्णी, सौ. सोनाली तांदूळजे यांच्यासह शेकडो पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. द्वारसभेनंतर व्यवस्थापनास निवेदन देण्यात आले. श्री विश्वास पाटील (उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी) यांनी निवेदन स्वीकारले.

# जुनी पेन्शन योजना लागू करा: शेख अब्दुल रहीम



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** राज्याचे शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री मा.ना. श्री.दिपकजी केसरकर साहेब हे औरंगाबाद जिल्हा दौऱ्यावर आले असताना महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन चे राज्य प्रवक्ता तथा हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी भेट घेतली व निवेदन सादर केले. खालील प्रश्न सोडविण्याची विनंती केली. १) नोव्हेंबर 2005 च्या नंतर सेवेत रुजू झालेले शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी. २) राज्यात शिक्षकांचे रिक्त पदे त्वरित भरण्यात यावी. ३) २०% व ४०% अनुदानित शाळांना प्रचलीत नियमानुसार शंभर टक्के अनुदान देण्यात यावे. ४) त्रुटी पात्र शाळांना अनुदान घोषित करण्यात यावे. ५) सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांना सरसकट प्रोत्साहन भत्ता तसेच पहिल्या दिवसापासून गणवेश देण्यात यावे. ६) शिक्षण सेवक मानधनात त्वरित वाढ करण्यात यावे. ७) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कॅशलेस आरोग्य योजना त्वरित लागू करावे. शालेय शिक्षण मंत्री महोदयांना आपल्या स्तरावर लक्ष देऊन सर्व विद्यार्थी शिक्षकांचे प्रश्न सोडवावे तसेच महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेसोबत एक बैठक मंत्रालयात आयोजित करावी अशी विनंती करण्यात आली. या वेळी हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशन चे संस्थापक सदस्य शाहरुख पठाण, सदस्य शेख अलीम आदींची उपस्थिती होती.

# अनागोंदी कारभाराच्या निषेधार्थ "मोफत झंडुबाम वाटप "आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज




**बीड :** धुळे - सोलापूर राष्ट्रीय महामार्गाचे शहरातुन जाणा-या १२ किलोमीटर अंतराच्या रस्त्याचे दुभाजक तसेच नाल्याचे काम अपुर्णच असुन चिखलमय रस्ता झाला आहे तसेच शहरातुन जाणारा अहमदनगर-बीड राज्य मार्गाची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे तसेच शहराच्या हद्दीतील रस्त्यावर जिल्हाधिकारी कार्यालय तहसिल कार्यालय,प्रशासकीय भवन,जिल्हा न्यायालयासह ईतर शासकीय कार्यालयात येणा-यांसह शहरातील नागरीकांची खड्ड्यांमुळे मोठी कसरत होत आहे. शहरांतर्गत जुना मोंढा,कारंजा रोड,नगर रोड,आदि भागातील खड्ड्याचे साम्राज्यास राजकीय नेते आणि प्रशासकीय आधिकारी जबाबदार असुन त्यांच्या अनागोंदी कारभाराच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा कार्याध्यक्ष भ्रष्टाचार निर्मूलन समिती महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, यांच्या नेतृत्वाखाली दि.१२ सप्टेंबर सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर "मोफत झंडुबाम तसेच वेदनाशामक वाटप आंदोलन करण्यात आले. आंदोलनात भ्रष्टाचार निर्मूलन समिती तालुकाध्यक्ष बीड शेख युनुस च-हाटकर ,राहुल कवठेकर, सय्यद आबेद बीडकर,शेख मुस्ताक,माजी सैनिक अशोक येडे,सय्यद सादेक,धनंजय सानप,दिपक बांगर, किस्किंदाताई पांचाळ,सारीका गायकवाड, आदि सहभागी होते. निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी संतोष राऊत यांना निवेदन देण्यात आले. जिल्हाधिकारी बीड यांच्यामार्फत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिनजी गडकरी,प्रकल्प संचालक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण औरंगाबाद अरविंद काळे,तसेच मुख्यमंत्री ,प्रधान सचिव नगरविकास मंत्री ,सार्वजनिक बांधकाम मंत्री,विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना देण्यात आले.

# वजनापूर सोसायटीवर संतोष जाधव यांचा वरचष्मा

## विविध कार्यकारी सोसायटीत तेरा पैकी तेरा जागेवर मिळवला विजय



आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील वजनापूर येथील जिल्हा परिषदचे मा. अर्थ बांधकाम सभापती संतोष पाटील जाधव यांच्या वजनापूर विविध कार्यकारी सोसायटीच्या निवडणुकीत संपूर्ण पॅनलचा दणदणीत विजय झाला. दरम्यान आज निवडणूक शांततेत पार पडली व लगेच निवडणूक झाल्यावर निकाल जाहीर करण्यात आले त्यात संतोष पाटील जाधव यांच्या पॅनलच्या सर्वच्या सर्व तेरा जागा निवडून आल्या त्यामुळे गावकऱ्यांनी मारुती मंदिरासमोर फटाक्याची अतिशबाजी करत व गुलाल उधळत एकच जल्लोष केला यावेळी संतोष पाटील जाधव, दशरथ कांबळे,अण्णासाहेब पाटील जाधव,अनिल पाटील चव्हाण शुभम पाटील जाधव,मन्सूब पाटील चव्हाण, अंकुश पाटील जाधव, परसराम चव्हाण यांच्यासह गावकरी उपस्थित होते.

# "राघव" फाऊंडेशन अंतर्गत "Be Positive- कुटुंब" तर्फे सेवाव्रतींचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** कै. नारायणराव व कै. पद्मावती रामदासी स्मृति " राघव " फाऊंडेशन अंतर्गत "Be Positive- कुटुंब" या आपुलकीने सकारात्मकता जपणाऱ्या संघटनेतर्फे तर्फे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्षाचे निमित्ताने, हेडगेवार रुग्णालयातील रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक यांची निरपेक्षपणे सेवा करणाऱ्या सेवाव्रती यांचा हृद्य सत्कार सोहळा आणि त्यानंतर देशभक्ती पर गीतांचा कार्यक्रम आयोजित केला होता.

"Be Positive- कुटुंब" ही संघटना गेल्या तीन वर्षांपासून सामाजिक कार्य क्षेत्रात कार्यरत आहे. मूळ संकल्पना आपली मुले/मुली शिक्षण/नोकरी निमित्ताने औरंगाबाद बाहेर आहेत? आपणास एकटेपणा जाणवत आहे? चला यातून बाहेर पडूया ! "B Positive कुटुंबात" सामील व्हा ही होती. आज आपण समाजात एक वेगळीच समस्या अनुभवत आहोत, बहुतांशी अनेकजण यातून जात आहेत. आज आपल्या शहरात बहुतेक सर्व कुटुंबामध्ये एक वेगळेच विभक्तपण आलेले दिसत आहे. एकत्रित कुटुंबे असुनही विभक्तता का बरे जाणवत आहे? मुख्य कारण जे प्रकर्षाने पुढे येत आहे ते म्हणजे मुले/मुलीं/सूना यांनी शिक्षणाच्या म्हणा किंवा करीयर/नोकरीच्या निमित्ताने आपले आई वडील यांच्या घरापासून, सहवासापासून भारतात इतरत्र किंवा परदेशात जाणे. त्यामुळे येथील सर्व प्रस्थापित आई वडील किंवा इतर कुटुंबीय यांच्यात जो अनामिक एकटेपणा, उदासीनता येऊ घालत आहे त्यातून सुखकरता येण्यासाठी, या समस्येतून सर्वांनी बाहेर यावे,सर्वांना दिलासा मिळावा म्हणून कै. नारायणराव आणि पद्मावती रामदासी स्मृती राघव फाऊंडेशन अशा सर्व कुटुंबीयांना एकत्र आणून एका वेगळ्या बंधनात, एका वेगळ्या नातेसंबंधात "Be Positive - कुटुंब" च्या माध्यमातून बांधण्याचा संकल्प घेतला. यामधून सर्वांचा अनामिक एकटेपणा तर दूर होईलच, त्याशिवाय नवीन मित्रांच्या, कुटुंबांच्या सहवासातून आयुष्य अधिकच आनंदी, सकारात्मक, सुखकर जगण्याची एक प्रेरणा या माध्यमातून एकत्रित वर्षभर विविध कार्यक्रम, सामाजिक उपक्रम राबवून आपल्या आयुष्याचा समाजातील इतर घटकांना देखील कसा आनंद देता येईल हे बघता येईल, नकारात्मकते कडून सकारात्मकते कडे नेण्याचा यशस्वी प्रयत्न होतो आहे. "आपुलकीने सकारात्मकता जपणारी माणसं" ही Be Positive कुटुंबाची ओळख आहे, ब्रीदवाक्य आहे. समाजातील सर्वच घटकांमधील रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक यांची निरपेक्षपणे, अविरतपणे हेडगेवार रुग्णालयात सेवा करणारे सेवा-व्रती यांच्या सेवेची दखल घेऊन Be Positive कुटुंब या संघटने तर्फे गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन, सरस्वती पूजन आणि तिरंगा ध्वज यास अभिवादन करून झाली. सीमा रामदासी यांनी Be Positive संघटनेच्या कार्याबद्दल प्रास्ताविक केले. विजयकुमार रामदासी यांनी हेडगेवार रुग्णालयात सेवा करणारे सेवा-व्रती यांच्या गौरव पूर्ण कार्याची दखल घेऊन सन्मान करण्यामागची भूमिका विषद केली. सेवाव्रती संघटनेचे प्रमुख श्री प्रल्हाद पानसे काका यांनी ते हेडगेवार रुग्णालयात करीत असलेल्या कार्य आणि उद्देश याबाबत सविस्तरपणे माहिती दिली. सर्व सेवाव्रती यांचा सन्मानचिन्ह, गौरव-पत्र आणि पर्यावरण संदेश म्हणुन रोपटे देऊन गौरव करण्यात आला. त्यानंतर वंदेमातरम हा देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम Be Positive कुटुंबातील सीमा रामदासी, विजयकुमार रामदासी, कांचन देशपांडे, भारती कानडे, सोमनाथ पिसोळे यांनी सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अलकाताई कुलकर्णी यांनी केले. भाऊ सुरडकर यांनी Be Positive कुटुंब संघटनेच्या वतीने मनोगत व्यक्त केले. वैशाली कुलकर्णी यांनी राघव फाऊंडेशन च्या वतीने मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला सदाचार ज्येष्ठ नागरिक संघटनेचे मोलाचे सहकार्य लाभले, त्यांच्या वतीने श्री अनिल चौधरी यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचा समारोप विभाताई देशपांडे यांनी केला. सर्व सेवा-व्रती यांचे संपूर्ण management सौ. विभा देशपांडे श्रीकांत देशपांडे व प्रमोद खंडेलवाल यांनी यशस्वीपणे केले. या कार्यक्रमात Be Positive-- कुटुंब या संघटनेचे खालील इतर सर्व सदस्य सक्रियपणे सहभागी झाले होते.

सुरेखाताई कोलंगडे, मीना पिसोळे, अनुजा अंकुश, प्रकाश तुपसांडे, गणेश कुलकर्णी ,आशा कुलकर्णी, स्मिता काळे, वैजिनाथ डोमाले सुनीता डोमाले, दिलीप कुलकर्णी, ज्योती कुलकर्णी संध्या बेंद्रे, शुभांगी कुलकर्णी, देविदास कुलकर्णी, अर्चना तुपसांडे, रजनीताई सुरडकर. या आमच्या Be Positive कुटुंब संघटनेत ज्यांना सामिल व्हायची इच्छा आहे त्यांनी वर उल्लेखलेल्या कोणत्याही सदस्यांशी अथवा खालीलप्रमाणे संपर्क साधावा.

# कपाशीवर गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव; शेतकरी चिंतातुर..!

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापुर :** तालुक्यातील लोणी खुर्द परिसरात शेकडो एकर शेतीमधील कपाशीचे पीक गुलाबी बोंड अळी व तुडतुडे यावर मात करण्यासाठी महागड्या औषधी फवारणी करत आहे. बोंड अळी रोखण्यासाठी शेतकऱ्यांनी बीटी कपाशीचा स्वीकार केला. सुरुवातीला त्याचा चांगला परिणाम दिसला. कापसाचे उत्पन्न देखील वाढले. मात्र बीटी बीजी टू बियाण्यांवरही बोंड अळीचा प्रादुर्भाव होऊ लागल्याने यंदा परिस्थिती गंभीर बनली आहे. गेल्या तीन चार वर्षांपासून दुष्काळी, नापिकीमुळे त्रस्त शेतकऱ्यांना यंदा कापसापासून उत्पन्न मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, मागील काही दिवसांपासून बीटी  कपाशी वाणावर गुलाबी बोंड अळीने आक्रमण केले आहे. त्यामुळे शेतकरी हताश झाला आहे. उत्पादन खर्च प्रचंड वाढत असताना उत्पादनात होणारी घट हे शेतकऱ्यापुढे मोठे संकट आहे. उच्चप्रतीच्या औषधांची फवारणी करूनही ही कीड नियंत्रणात येऊ शकली नाही. बोंडे तयार होण्याच्या अवस्थेत असतांना अळीने आक्रमण केले आहे.

बोंड अळीचा प्रादुर्भाव झाल्याच्या तक्रारी येत आहेत. कृषी विभागाचे कृषी पर्यवेक्षक डिसेंबर व्ही पुंड कुषी साहाय्यक  ललिता लकारे हे शेतात जाऊन शेतकर्याच्या भेटि घेऊन मार्गदर्शन करीत आहे.

सद्यःस्थितीत कपाशी बोंड लागण्याच्या तसेच परिपक्वतेच्या अवस्थेत असुन गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव कमी अधिक प्रमाणात दिसुन येत आहे. गुलाबी बोंडअळी ही अतिशय नुकसानकारक कीड आहे. ती बोंडाच्या आत राहून उपजीविका करते, बाहेरून या किडीच्या प्रादुर्भावाची कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. होणारे नुकसान टाळण्यासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापनाचा अवलंब करावा, असा सल्ला  कृषी विभागाने दिला आहे. गुलाबी बोंडअळी अंड्यातून निघुन ताबडतोब कळ्या, फुले व बोंडाना छोटे छिद्र करून आत शिरते. सुरूवातीला अळ्या पाते, कळ्या, फुलांवर उपजीविका करतात. प्रादुर्भावग्रस्त फुले अर्धवट उमलेलल्या कळीसारखी दिसतात, अशा कळ्यांना डोमकळया  म्हणतात. प्रादुर्भावग्रस्त पाते, बोंडे गळून पडतात किंवा परिपक्क न होताच फुटतात व गळून गेलेली बोंडे सडतात. बोंडामध्ये एकदा का ही अळी शिरली की तिची विष्ठा व बोंडाचे बारीक कण यांच्या साहाय्याने ही छिद्रे बंद करते. त्यामुळे बोंडावर या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत नाही. अळी रूई कातरून नुकसान करते. त्यामुळे रूई सडते व खराब होते. प्रादुर्भावग्रस्त बोंडाची वाढ खुंटते, बोंडे पूर्णपणे फुटत नाहीत. अळी बोंडातील बिया खाते व एका कप्प्यातून दुसऱ्या कप्प्यात शिरते. त्यामुळे रूईची प्रत खालावते.



### अशी करा फवारणी

1. प्रोफेनोफॉस 50 टक्के 400 मिली प्रती एकर किंवा 2. इमामेक्टिन बेंझोएट 5 टक्के 88 ग्रॅम प्रती एकर किंवा 3. प्रोफेनोफोस 40 टक्के + सायपरमेथ्रीन 4 टक्के (पूर्व मिश्रित कीटकनाशक) 400 मिली प्रती एकर आलटून पालटून फवारावे. वरील कीटकनाशका सोबत कुठल्याही प्रकारचे इतर कीटकनाशके, बुरशीनाशके, विद्राव्य खते,सूक्ष्म मूलद्रव्ये अथवा रसायने मिसळू नये.

-डी. व्ही. पुंड, कृषी परवेक्षक

### कृषि विभागाचे आवाहन

कपाशीमध्ये गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आतापासूनच नियोजन करणे आवश्यक आहे. काही भागात जुन च्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात लागवड झालेल्या कपाशीला फुले लागली असून पिकाचे फिरून निरीक्षण केल्यास डोमकळी वरून ( अर्धवट उमललेले गुलाबाच्या फुलाप्रमाणे ) त्यावर गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आढळून आला काय आपण पाहू शकतो, सद्या वातावरण ढगाळ असल्याने व कापसाला पाते, फुले लागत असल्याने गुलाबी बोंडअळीचे पतंग सक्रीय झालेले असतात . मादी पतंग पाते, फुले यावर अंडी घालतात, त्यामुळे कपाशीच्या पिकात कामगंध सापळे लावण्याची व फवारणी ची ही योग्य वेळ आहे जेणेकरून पुढे बोंडे लागल्यानंतर होणारा प्रादुर्भाव आतापासूनच निरीक्षणाद्वारे कमी करता येईल.त्यासाठी खालीलप्रमाणे नियोजन करावे.


कपाशीच्या पिकात नियमित सर्वेक्षण करुन डोमकळ्या दिसून आल्यास त्या तोडून आतील अळीसह नष्ट कराव्यात. गुलाबी बोंडअळीसाठीचे कामगंध सापळे हेक्टरी 05 या प्रमाणात लावावीत. निंबोळी अर्क अथवा बिव्हेरिया बॅसियाना या जैविक बुरशी युक्त कीटकनाशकाची 800 ग्रॅम प्रति एकर फवारणी करावी निंबोळी अर्क तीन प्रकारे कार्य करतो एक उग्र वासामुळे पतंग अंडी टाकण्यास प्रतिबंधक म्हणून तसेच अंडीनाशक म्हणून आणि पुढची पिढी नपुसंक बनवण्याचे काम करतो.त्यामुळे खालील नमूद एका औषधासोबत हे आवश्यक आहे व जास्त परिणामकारक आहे.

# बाप-लेकाच्या मराठी इंग्रजी कवितासंग्रहाचे रविवारी प्रकाशन!

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** विदर्भातील प्रसिद्ध लोक गायक ,कवी ,साहित्यिक खेमराज भोयर यांनी लिहलेला कविता संग्रह व 8 व्या वर्गात शिकणारा त्यांचा मुलगा शृंखल खेमराज यांनी लिहिलेल्या इंग्रजी कविता संग्रहाचे एकत्रित विमोचन येत्या रविवारी शासकीय दीक्षा भूमी जवळीक सामाजिक न्याय भवन येथील सभागृहात करण्यात येणार आहे.

या विमोचन कार्यक्रमा सोबत दिवसभर नागपूर कर नाट्य प्रेमी व साहित्यिकासाठी विविध कार्यक्रमाचे ही आयोजन करण्यात आले आहे. सकाळी 10.30 वा.खेमराज भोयर यांच्या लिखित"साल अतीच झालं" तर त्यांचा 12 वर्षीय मुलगा शृंखल भोयर यांचा इंग्रजी भाषेत लिहिलेल्या "द स्टीडीली चेंज"या कविता संग्रहाचे एकत्रीत विमोचन  सुप्रसिद्ध आंबेडकरी साहित्यिक मुंबई विद्यापीठाचे माजी इंग्रजी विभाग प्रमुख बी रंगराव यांच्या हस्ते व विशेष अतिथी अतिरिक्त आयकर आयुक्त धनंजय वंजारी ,नांदेड विद्यापीठाचे प्रा.दिलीप चव्हाण,मुंबई विद्यापीठाच्या डॉ.वंदना महाजन,यवतमाळ चे प्रा.माधव सरकुंडे, नागभीड चे डॉ.अनमोल शेंडे सह समाज कल्याण नागपूर चे प्रादेशिक आयुक्त डॉ.सिद्धार्थ गायकवाड, जेष्ठ पत्रकार प्रमोद कालबांडे,प्रसिद्ध चित्रकार श्रीधर अंभोरे, नारायणन विद्यालयाच्या प्राचार्य रेखा नायर,झुंड चित्रपटाचे नायक अंकुश गेडाम, परिष प्रकासनाचे गिरीश भांदवलकर,गायक अनिरुद्ध बनकर  ,बादल श्रीरामे,शुध्दोधन गराडकर यांच्या उपस्थितीत सम्पन्न होईल.कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात दुपारी 4 वाजता सुप्रीद्ध गायक अनिरुद्ध बनकर यांचा खेमराजची वाणी-अनिरुद्धची गाणी हा संगीतमय कार्यक्रम व शेवटी कविसंमेलन सम्पन्न होईल.विदर्भातील प्रसिद्ध कवी उषाकिरण आत्राम यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कवी संमेलनात अजय खडसे,नरेंद्र सोनारकर, जित्या जाली, पुरंदर, रमेश बुरबुरे ,स्वाती बंगाळे, पंढरपूर,स्नेहल सोनटक्के, गोविंद पोलाड,डॉ.भीमराव गोटे,आदी सह 30 कवी आपल्या काव्य रचना सादर करतील .या नाविन्यपूर्ण बाप-लेकाच्या  कविता संग्रह विमोचन व साहित्य जत्रेत कवी व नाट्य,साहित्य क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने सामील होऊन उत्साह वाढवावा असे आवाहण डॉ.शुभांगी भोयर,अतुल खोब्रागडे,आदी ने केले आहे.




# सततच्या पावसामुळे पिकांचे नुकसान; बळीराजा हवालदिल



आधुनिक केसरी न्यूज

**सचिन गवळी**

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगीसह परिसरात सततच्या पावसामुळे शेतातील पिकांचे पुर्णपणे नुकसान झाले आहे. आता हातात काहीच उत्पन्न येणार नसल्याने बळीराजा हवालदिल झाला आहे. आणि आता तरी बळीराजाकडे ध्यान द्या हो साहेब! अशी विनंती शेतकरी सरकारला करत आहेत. प्रत्यक्ष नुकसान असूनही ईपीक पाहणी करा, पीक विमा मिळवायचा असेल तर पीक विमा कंपनीला कळवा. आदी अटींमुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. कारण ज्या शेतकऱ्यांना यातली थोडीफार माहिती आहे ते ही प्रक्रिया पूर्ण करतील. मात्र माहिती नसणाऱ्यांनी काय करावं असा प्रश्न शेतकरी करत आहेत. आणि नुकसानभरपाई मिळावी याची प्रतीक्षा करत आहेत. पावसाळ्याच्या सुरवातीपासूनच बाजार सावंगीसह परिसरात सतत जोरदार पाऊस होत आला असून अजूनही तीच परिस्थिती आहे. परिणामी कापूस, मका, तूर आदी सर्वच पीक वाया गेले आहे. सततच्या पावसाने पिकांची वाढ झाली नाही व शेतांमधे पाणी साचले असल्याने जे काही उगवलेले पीके आहेत ती पिवळी पडली आहेत, तर काही ठिकाणी पुर्णपणे खराब झाले आहे. त्यामूळे लवकरात लवकर नुकसानभरपाई मिळावी, अशी अपेक्षा बळीराजाला आहे. पंचनामे, पाहणी फक्त नावाला न करता पंचनामे करून प्रत्यक्षात नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

# शिर्डीच्या साई संस्थानचे विश्वस्त मंडळ बरखास्त

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शिर्डीच्या साई बाबा संस्थानचे विश्वस्त मंडळ बरखास्तीचे आदेश औरंगाबाद हायकोर्टाने दिले आहेत. येत्या दोन महिन्यात नव्याने विश्वस्त मंडळ नेमण्यात यावे, अशा सूचनाही कोर्टाकडून देण्यात आल्या. या निर्णयामुळे शिर्डी येथील साई मंदिर पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.  नुकताच शिर्डीच्या साई मंदिरात भाविकांना हार फुले घेऊन जाण्यास मज्जाव करण्यात आला होता. त्यावेळी साईबाबा मंदिर परिसरात मोठे आंदोलन करण्यात आल्याने हा मुद्दा चर्चेत होता. या संदर्भात देखील एक महिन्याच्या कालावधीत याबाबत निर्णय घेण्याचे आदेश देण्यात आले होते. आता शिर्डी साई मंदिर विश्वस्त मंडळाबाबत औरंगाबाद हायकोर्टाने सनसनी निर्णय दिला आहे. विश्वस्त मंडळ बरखास्त करण्याचे आदेश देण्यात आले असून पुढील दोन महिन्यात नव्याने विश्वस्त मंडळ नेमण्याच्या सूचना कोर्टाने दिल्या आहेत. मागील सहा महिन्यापूर्वी शिर्डी साई बाबा मंदिर संस्थानचे विश्वस्त मंडळ नेमण्यात आले होते. मात्र तेव्हापासून या विश्वस्त मंडळाला विरोध करण्यात येत होता. साई बाबा मंदिर संस्थानच्या जाहीरनाम्यानुसार हे विश्वस्त मंडळ नेमण्यात आले नसल्याचा आरोपही करण्यात येत होता. या पार्श्वभूमीवर विश्वस्त मंडळ नेमल्यापासून येथील उत्तरामराव शेळके यांनी औरगांबाद खंडपीठात धाव घेत याबाबत याचिका दाखल केली होती. या पार्श्वभूमीवर गेल्या तीन चार महिन्यापासून याबाबतची केस औरंगाबाद कोर्टात होती, आज याबाबत कोर्टाने निर्णय देत विश्वस्त मंडळ बरखास्त करण्याचे आदेश दिले आहेत.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

## सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

### हनिमून भाग - ०३

आधुनिक केसरी

* प्लॅन बी नावाच्या पिल्स या आधीच घेऊन ठेवाव्यात कारण. अनेक वेळा, अनेक ठिकाणी त्या उपलब्ध होत नाहीत.

* परदेशामध्ये 'झीक व्हायरस' आढळून येतो. त्यामुळे आधीच लस टोचून घेणे आवश्यक आहे. या व्हायरसचे इन्फेक्शन झाले तर जन्माला येणाऱ्या बाळामध्ये जन्मतः व्याधी निर्माण होण्याची शक्यता अधिक प्रमाणात आढळून आली आहे.

* परदेशांतून आल्यावर कमीत कमी सहा महिने बर्थ कंट्रोल पिल वापराव्यात. कारण एखादा चुकून देश झाला असेल तर तो व्हायरस जाण्यास किमान ५ ते ६ महिने लागतात.

**हनिमून सिस्टायटीस म्हणजे काय?**

हनिमूनला गेल्यानंतर सेक्स ही पेनफुल अवस्था होत असेल किंवा आजारी पडण्याची वेळ येत असेल तर काय करावे ? **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com